# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. १३/०१/२००६

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक १३/०१/२००६ रोजी सभा सुचना क्र. २३ दि. ०६/०१/२००५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ५) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| ६) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ७) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| ८) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ९) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| १०) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| ११) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| १२) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| १३) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| १४) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| १५) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मिलन गोविंदराव पाटील | सदस्य |

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मा. आयुक्त साहेब, मा. उपायुक्त साहेब सर्व खात्याचे अधिकारी आणि मनपा कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे या सभेमध्ये स्वागत करतो. आणि सभेला सुरुवात करावी अशी मी प्र. सचिवांना सुचना करतो.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यावर जी हायमाक्स व फ्लग फ्लाईड लाईट लावल्यामुळे त्या विभागात किंवा त्या परिसरात निश्चितच एक चांगले वातावरण निर्माण झालेले आहे. पूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यावर प्रकाश पडत नव्हता. तो पुतळा आता तेजाने झळकत आहे. महानगरपालिका प्रशासनाने लाईटची व्यवस्था केल्याबद्दल मी त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**मोहन पाटील :-**

त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडत आहे म्हणजे कोणाच्या अभिनंदनाचा ठराव मांडता?

**रतन पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाचा अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**मोहन पाटील :-**

मग आम्ही काय केले?

**रतन पाटील :-**

प्रशासन म्हणजे प्रशासनाच्या अभिनंदनाचा ठराव मांडतो. त्याच्यामध्ये मा. आयुक्त साहेब, मा. उपायुक्त साहेब, सर्व पदाधिकारी, सर्व अधिकारी आणि लोकप्रतिनिधींचे अभिनंदन करतो.

**सुर्यकांत भोईर :-**

परंतु, ते काम आमच्या पक्षाने केलेले आहे.

**रतन पाटील :-**

कोणत्याही पक्षाने काम केलेले असेल तरी आम्ही त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडतो.

**मोहन पाटील :-**

परंतु, ते काम आमच्या पक्षाने केलेले आहे.

**रतन पाटील :-**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यावर लाईट लावण्याचे काम सर्व पक्षांनी केलेले आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यावर लाईट लावण्याचे काम माझ्या प्रभागातील आहे. ते काम आम्ही केलेले आहे. तुम्ही ते काम केलेले नाही.

**रतन पाटील :-**

परंतु, आमची मागणी होती.

**प्रेमनाथ पाटील :-**

सिग्नलबाबत माझी मागणी होती. परंतु, त्याच्यामध्ये आमचीसुध्दा मागणी होती.

**अभिनंदन ठराव क्र. १९० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यावर जी हायमाक्स व फ्लग फ्लाईड लाईट लावल्यामुळे त्या विभागात किंवा त्या परिसरात निश्चितच एक चांगले वातावरण निर्माण झालेले आहे. पूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यावर प्रकाश पडत नव्हता. तो पुतळा आता तेजाने झळकत आहे. महानगरपालिका प्रशासनाने लाईटची व्यवस्था केल्याबद्दल ही सभा प्रशासनाचे अभिनंदन करीत आहे.

**सुचक :- श्री. रतन पाटील.** **अनुमोदन :- श्री. रमेश जैन.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १८५ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्या श्रीम. ज्युडी डिसोझा यांनी ठरावाचे वाचन केले.)

**एस. ए. खान :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. १८५ :-**

दि. २७/१०/२००५ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १९१ :-**

दि. २७/१०/२००५ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्रीम. ज्युडी डिसोझा.** **अनुमोदन :- ॲड. श्री. एस्. ए. खान.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १८६ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. एस. ए. खान यांनी ठरावाचे वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**कैलासबेन जानी :-**

साहेब, तुम्ही ही जी चेसी मागवणार आहात, ती चेसी तिसरा मजला, चौथा मजला, सातवा मजला म्हणजे कितव्या मजल्यापर्यंत असेल. म्हणजेच ती शिडी अंदाजे किती लिमिटपर्यंत असेल ते सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्या शिडीचे लिमिट किती असेल ते सांगा?

**गजानन भोईर :-**

त्या चेसीची काय क्षमता असेल ते सांगा?

**मा. सभापती :-**

या शिडीचे लिमिट तीन मजल्यापर्यंत असेल.

**कैलासबेन जानी :-**

तुम्ही तीन मजल्याच्या लांबीची शिडी मागवणार आहात. परंतु, आपल्या शहरात चार मजल्यापर्यंत बिल्डींग आहेत. मग तुम्ही ही शिडी कशी वापरणार?

**गजानन भोईर :-**

मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये अकरा मजली एक इमारत आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

ती बिल्डींग अकरा मजली नसून चौदा मजली आहे. त्या बिल्डींगचे नांव जांगीड टॉवर आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

जांगीड टॉवर नावाची बिल्डींग चौदा मजली आहे.

**गजानन भोईर :-**

आपण एवढा खर्च करणार मग ह्या शिडीचे लिमिट थोडे जास्त ठेवा.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही ही शिडी सात मजली ठेवा. अजून थोडी ॲड करा. कारण ही शिडी तीन मजल्यापर्यंत ठेवून काहीही उपयोग नाही.

**रतन पाटील :-**

ती शिडी सातव्या मजल्यापर्यंत ठेवा.

**कैलासबेन जानी :-**

एकदाच खर्च करा आणि चांगल्या आधुनिक प्रकारची शिडी आणा. आम्ही दोन वर्षापूर्वी मागणी केलेली होती. तरीसुध्दा शिडी मिळण्याचे काम झालेले नाही.

**गजानन भोईर :-**

आपण अर्धवट तिसऱ्या मजल्यापर्यंत शिडी घ्यायची आणि बिल्डींग सात-सात मजली असल्या की प्रॉब्लम होतो.

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

त्यांनी रु. २ कोटी दिलेले आहेत.

**गजानन भोईर :-**

एवढे पैसे गेले तरी अर्धवट काम झाले.

**कैलासबेन जानी :-**

तुम्ही आम्हाला या कामाची सविस्तर माहिती द्या.

**गजानन भोईर :-**

हे काम तोडांशी येऊनसुध्दा काहीही उपयोग नाही. असा याचा अर्थ होतो.

**सुर्यकांत भोईर :-**

ती शिडी तिसऱ्या मजल्यापर्यंत घेऊन काय उपयोग आहे? शिवाय ती शिडी चौथ्या मजल्यापर्यंत जात नसेल तर काहीही उपयोग नाही. ती शिडी तिसऱ्या मजल्यापर्यंत न घेणे उत्तम आहे. तुम्ही त्या शिडीची कमीत कमी सातव्या मजल्यापर्यंत व्यवस्था करा.

**गजानन भोईर :-**

तुम्ही चांगली आणि व्यवस्थित अशी शिडी घ्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही तीन मजल्यापर्यंत शिडी बनवित आहात. परंतु, सातव्या मजल्यावर आग लागली असेल तर ती आग कशी विझवायची ते सांगा?

**मा. सभापती :-**

आपण हा विषय पुढच्या बजेटमध्ये घेऊया.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही बोलता की हा विषय पुढच्या बेजटमध्ये घेऊ. मग आपण तोपर्यंत काय करायचे?

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण या संदर्भात योग्य तो निर्णय घेऊया.

**मा. सभापती :-**

आपण पुढच्या वर्षी हा विषय घेऊया.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, हा विषय आपण पुढच्या बजेटमध्ये घ्यायला सांगतात. परंतु, पुढच्या बजेटमध्ये मागच्या बजेटसारखेच होईल.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही आता केवढी शिडी पाहिजे ते बघून घ्या आणि नंतर हा विषय पुढच्या बजेटमध्ये घ्या. तुम्ही तरतुद करताना पुढच्या बजेटची तरतुद करा.

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

त्या वेळेच्या महासभेने हा विषय मंजूर केलेला होता.

**गजानन भोईर :-**

तुम्ही शिडी घेताना चांगली शिडी घ्या. तुम्ही हा विषय महासभेला पाठवा आणि मंजूर करुन घ्या.

**मा. सभापती :-**

हा विषय झालेला आहे.

**मोहन पाटील :-**

आपण ह्या विषयाची निविदा मागवलेली आहे आणि मंजूर करुन घेतली आहे. हा विषय पुर्नविनियोजनामध्ये आला तर मंजूर करुन घेऊया. सर्व सन्मा. सदस्यांच्या मागणीनुसार आणि सर्व शहराच्या आवश्यकतेनुसार ही शिडी मागवली पाहिजे.

**सुर्यकांत भोईर :-**

ही शिडी कमीत कमी सातव्या मजल्यापर्यंत पोहचेल अशी करा. ही शिडी तिसऱ्या मजल्यापर्यंतच गेली तर काहीही उपयोग नाही.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईर साहेब, आपण हा विषय पुढच्या बजेटमध्ये घेऊन चांगल्या प्रतीची शिडी मागवणार आहोत. तुम्हाला चौदाव्या मजल्यापर्यंत शिडी हवी असेल तर चौदा मजल्यापर्यंत घ्या किंवा पंधराव्या मजल्यापर्यंत हवी असेल तर पंधराव्या मजल्यापर्यंत घ्या.

**सुर्यकांत भोईर :-**

मग तुम्ही हा विषय पुढच्या बजेटमध्ये घ्या. आता हा विषय घेऊ नका.

**मा. सभापती :-**

महासभेमध्ये शिडीबाबत ठराव पास झालेला आहे.

**गजानन भोईर :-**

महासभेने ठराव केलेला असला तरी पिठासीन अधिकारी त्या ठरावावर आपले मत मांडू शकतो. आपल्या शहरात सात-सात मजली इमारती आहेत आणि या शिडीची कॅपॅसिटी तिसऱ्या मजल्यापर्यंत आहे. त्यामुळे हा विषय पुन्हा महासभेत आणू शकतो का? असे मा. सभापती सांगु शकतो.

**एस. ए. खान :-**

आता लोकवस्ती वाढत चाललेली आहे. त्यामुळे आपल्याला सात मजल्यापर्यंतच्या शिडीची गरज लागू शकतो.

**गजानन भोईर :-**

ही शिडी फक्त तिसऱ्या मजल्यापर्यंत घ्या असे महासभेने सांगितलेले नाही.

**एस. ए. खान :-**

मा. सभापती साहेब, आता लोकवस्ती वाढत चाललेली आहे. त्यामुळे आपण गरज पडली तर आणखी शिड्या मागवू शकतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, या ठरावामध्ये जे नमुद केलेले आहे त्याचा या ठरावामध्ये उल्लेख नाही. दि. १७/८/२००५ ठराव क्र. ३४ मध्ये आपण चेसी तिसऱ्या मजल्यापर्यंत घेणार आहोत याचा उल्लेख केलेला नाही.

**केशव घरत :-**

ही शिडी तिसऱ्या मजल्यापर्यंत घेणार की सातव्या मजल्यापर्यंत घेणार याचा उल्लेख केलेला नाही.

**एस. ए. खान :-**

परंतु, आपल्याकडे दहा लाखाच्या लोकवस्तीकरिता एकच शिडी आहे. एक शिडी बिघडली किंवा काय झाले तर त्याच्यासाठी दुसरी शिडी मागवता येते म्हणून आपण दुसरी शिडी मागवणार आहोत.

**केशव घरत :-**

साहेब, या गोषवाऱ्यामध्ये चेसी तिसऱ्या मजल्यापर्यंत घेण्याबाबतचा उल्लेख केलेला नाही.

**कैलासबेन जानी :-**

आपल्याकडे सध्या जी चेसी आहे ती व्यवस्थित आहे का?

**मोहन पाटील :-**

आपल्याकडे सध्या जी चेसी आहे ती व्यवस्थित आहे हे बरोबर आहे. परंतु, ती शिडी आपल्याला उपयोगी पडणार आहे.

**कैलासबेन जानी :-**

आपल्याला ही शिडी उपयोगी पडणारच आहे.

**मोहन पाटील :-**

जर सातव्या मजल्यावर आग लागली तर आपल्याला ती आग विझवता येईल आणि तिसऱ्या मजल्यावर काही झाले तर ती चेसी त्याच्यासाठी वापरता येईल. म्हणजे एकाच वेळेला सगळ्या गोष्टी करता येतील.

**गजानन भोईर :-**

ती शिडी एका वेळेला तिसऱ्या मजल्यावर आणि सातव्या मजल्यावर पोहचवता येईल.

**मोहन पाटील :-**

या चेसीचा उपयोग एकाच वेळेला होणार नाही.

**गजानन भोईर :-**

तिसऱ्या मजल्यावर किंवा सातव्या मजल्यावर एकाच वेळेला आग लागणार नाही.

**मोहन पाटील :-**

आग थांबू शकत नाही. आपण आगीबद्दल सांगु शकत नाही.

**जयंत पाटील :-**

मुळात आपल्या शहरात तीन मजली किंवा चार मजली खुप बिल्डींग आहेत. जर आपण कम्पेरिटिव्हली बघितले तर टॉवर्स आणि चार मजली बिल्डींग भरपूर आहेत. आपल्याला भविष्यात एक शिडी घेऊन चालणार नाही. आपल्याला नविन शिडी घेता येईल आणि आपल्याकडे ही शिडी तशीच राहील.

**सुर्यकांत भोईर :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील, मी तुमच्या मताशी सहमत आहे. परंतु, तुम्ही तिसऱ्या किंवा चौथ्या मजल्यापर्यंतची शिडी घ्या.

**मोहन पाटील :-**

आपल्याकडे ही निविदा आलेली आहे. आपण ही निविदा मंजूर करु आणि नंतर शिडी मागवू.

**सुर्यकांत भोईर :-**

आपल्याकडे चार मजली बिल्डींग आहेत आपण सात मजली शिडी घेतली तर त्या शिडीचा उपयोग तिसऱ्या मजल्यासाठीसुध्दा होईल.

**मोहन पाटील :-**

मिरा भाईंदरमध्ये इंडस्ट्रीचे प्रमाण जास्त आहे. मिरा भाईंदरमध्ये जवळजवळ दहा ते पंधरा हजार गाळे आहेत. त्या ठिकाणी ही शिडी उपयोगी पडेल.

**सुर्यकांत भोईर :-**

ही शिडी चार मजली आणि तीन मजली बिल्डींगला उपयोगी पडेल. जर तुम्ही तिसऱ्या मजल्यापर्यंत शिडी घेतली आणि चौथ्या मजल्यावर आग लागली तर तुम्ही काय कराल?

**मोहन पाटील :-**

आपण दुसरी शिडी मागवूया.

**मा. सभापती :-**

आपल्याला दुसरी शिडी मागवायची आहे.

**रमेश जैन :-**

चार मजल्यापर्यंतची शिडी मागवा.

**गजानन भोईर :-**

तीन मजल्यांऐवजी चार मजल्यापर्यंतची शिडी मागवा. एक माळ्याने काहीही फरक पडणार नाही.

**मा. सभापती :-**

आपण दुसरी शिडी चांगल्या प्रतीची आणि आणि सोळाव्या मजल्यापर्यंत जाणारी मागवणार आहोत.

**सुर्यकांत भोईर :-**

आताच चार मजल्यापर्यंतच्या शिडीचा प्रपोजलमध्ये सोळाव्या मजल्यापर्यंतच्या शिडीचे ॲड करुन घ्या.

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

चार मजल्याची शिडी उंच होते. आपल्याला चार मजल्यापर्यंत घेता येत नाही. तशी एक शिडी ठाण्याला दिलेली आहे..

**रतन पाटील :-**

आपण तीन-चार मजल्याच्या शिड्या घेतो. आपण त्याबाबतचा प्रस्ताव पुढच्या बजेटमध्ये घेऊ.

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आपल्याकडे एकूण तीन शिड्या होत्या.

**गजानन भोईर :-**

तुम्ही मागच्या शिडीचे बोलत आहात. आपण आता ज्या शिडीचे बोलतो त्याच्यामुळे लोकांचा फायदा होणार आहे.

**मा. सभापती :-**

तो विषय त्यावेळेला झालेला होता.

**रतन पाटील :-**

आज मिरा भाईंदरमध्ये फास्ट डेव्हलपमेन्ट होत आहे. सात-सात मजली टॉवर्स होत आहेत. माझी मा. आयुक्त साहेब व मा. सभापती साहेबांना विनंती आहे की, आपण ज्यावेळेला प्लॅन पास करतो, त्याच्यामध्ये जी सात मजली टॉवर्स आहेत त्यांना फायरची इन्स्ट्रयुमेन्ट कम्प्लसरी करावी आणि त्या पध्दतीने कामकाज व्हावे.

**मा. सभापती :-**

तुम्ही आम्हाला तुमचा निर्णय पाठवून द्या.

**मोहन पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही सन्मा. सदस्य रतन पाटील यांना त्यांचा निर्णय पाठवायला सांगता. तरीसुध्दा मला या विषयावर असे म्हणायचे आहे की, तुम्ही हा योग्य विषय आणलेला आहे. परंतु, जी लोक दहा-दहा मजली किंवा सात-सात मजली इललिगल बिल्डींग बांधतात. त्यांचे काय करायचे?

**प्रेमनाथ पाटील :-**

आपली नगरपालिका त्यांना परमिशन देते. मग या ठिकाणी कोणाची काय चुक आहे. ते प्रथम बघा.

**सुर्यकांत भोईर :-**

अतिक्रमणाच्या बिल्डींगबाबत कोण उत्तर देणार आहे?

**प्रकरण क्र. १८६ :-**

अग्निशमन दलातील वॉटर टेंडर चेसी बांधणे कामी आलेल्या निविदांना मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. १९२ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका अग्निशमन विभागासाठी लागणारे नवीन फायर फायटर खरेदी करणेकामी मा. महासभ्ज्ञेने दि. १७/०८/२००५ ठराव क्र. ३४ अन्वये मंजुरी दिलेली आहे. त्यास अनुसरुन चेसी बांधणेसाठी दि. १८/१२/२००५ रोजी दै. जन्मभूमी व गांवकरी या वृत्तपत्रात फेर जाहीर निविदा सुचना प्रसिद्ध करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यास अनुसरुन सदर कामी निविदा मुदतीत प्राप्त झाल्या असून सदरच्या निविदा दि. २९/१२/२००५ रोजी उघडण्यांत आल्या असून त्यांचे दराचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| अ.क्र. | तपशिल | मे. ब्रिजवाशीा हि. टेक उद्योग लि. | मे. वाडीया बॉडी बिल्डर्स | मे. कुंबरजी देवशी ॲन्ड कं. प्रा.लि. |
|---|---|---|---|---|
| १ | वॉटर टेंडर LPT १६१३/४२ ६९७<br>TCIC EURO - II<br>१२१० FACE PS<br>बॉडी बांधणे | २२,९६,०००/- | २२,१०,७५१/- | २१,०८,९२५/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मे. कुँवरजी देवशी ॲन्ड कं.प्रा.लि. यांचे दर सर्वात कमी व वाजवी व सर्व करासह आहेत. त्यांनी ५०% आगाऊ देयकाची मागणी केलेली आहे. सर्वात कमी दराची निविदा स्विकारण्यांस व या कामी येणाऱ्या खर्चास व ५०% आगाऊ देयक देण्यांस मा. स्थायी समिती मंजुरी देत आहे.

**सुचक :- ॲड. श्री. एस्. ए. खान.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १८७ चे वाचन केले.)

**कैलासबेन जानी :-**

साहेब, आमच्या केबीनमध्येसुध्दा बसु शकत नाही.

**मोहन पाटील :-**

आमच्या केबीनमध्ये आमच्या पक्षाचे लोक बसु शकत नाही. आमच्या केबीनमध्ये ३३ लोक बसु शकत नाहीत. आमचे केबीन एवढे लहान आहे.

**गजानन भोईर :-**

तुम्ही मधले पार्टीशन काढा म्हणजे सगळ्या पक्षाची लोक बसतील.

**कैलासबेन जानी :-**

आमच्या इथेसुध्दा जागा होत नाही. त्यामुळे आमच्याकडेसुध्दा केबीन करा.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आपल्या राष्ट्रवादी, शहर विकास आघाडी, शिवसेना बी.जे.पी., कॉंग्रेस, जनता दल असे सर्व पक्ष मिळून आपल्याकडै एकूण सहा पक्ष आहेत. आपल्याकडै कमीत कमी ७९ नगरसेवक आहेत. या सर्वांपैकी गटनेत्याची केबीन किती टक्के लोकांना दिली पाहिजे असे काही आहे का?

**गजानन भोईर :-**

कायद्यामध्ये तसे नमुद केलेले नाही.

**रतन पाटील :-**

कायद्यामध्ये असे असेल तर तुम्ही प्रथम कायदा इकडे घेऊन या आणि आम्हाला दाखवा.

**प्रेमनाथ पाटील :-**

मी या ठिकाणी फक्त माझी शंका उपस्थित केलेली आहे. आपण असा कायदा करुन घेऊ.

**मोहन पाटील :-**

त्या-त्या पक्षाचे किमान दहा टक्के द्यायला पाहिजे. त्यांना केबीन दिली पाहिजे. तुम्ही तीन-चार लोकांना केबीन देण्याचा मुद्दा उपस्थित करणे योग्य नाही.

**रतन पाटील :-**

कायदा दाखवा आणि बोला.

**सुर्यकांत भोईर :-**

आपल्याकडे तीन किंवा सहा माणसांना केबीन काढायला पाहिजे.

**एस. ए. खान :-**

आपल्याकडे सहा माणसे असली तरी केबीन काढण्यात यावे.

**मोहन पाटील :-**

आपण तसा कायदा करुया.

**प्रेमनाथ पाटील :-**

वाटल्यास आपण तशाप्रकारचा ठराव करुया.

**मोहन पाटील :-**

आपल्या स्थायी समितीने गटनेत्यांना केबीन द्यायची ठरविलेले होते आणि आज या स्थायी समितीमध्ये हा विषय आलेला आहे. सदस्यांची संख्या किमान दहा किंवा पाच टक्के ठरवा. जेवढ्या सन्मा. सदस्यांना केबीनची आवश्यकता वाटत असेल त्यांना केबीन द्या. नाहीतर तीन-चार लोकांना आपल्या केबीनमध्ये बसवूया.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण तीन-चार लाकांना आपल्या केबीनमध्ये ॲडजेस्ट करुया.

**रतन पाटील :-**

तुम्ही आघाडी पक्षाच्या लोकांना घेतलेले आहे.

**मोहन पाटील :-**

मा. सभापती साहेब, मी इतर पक्षांना विरोधी पक्ष असे बोलत नाही. मी इतर पक्षांना सहकारी पक्ष बोलतो. आपल्या सदनामध्ये एकूण सदस्य संख्या किती आहे याचासुध्दा विचार केला पाहिजे.

**गजानन भोईर :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील, सहकारी पक्षाचा काय अर्थ आहे? हे तुम्हाला माहिती नाही असे मला वाटते.

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील, सगळ्या बाबतीत सहकार्य पाहिजे. परंतु, तुमचे कुठल्याही बाबतीत सहकार्य नाही. सहकार्य एकाच बाजूला असते का?

**मोहन पाटील :-**

सहकारी पक्षाविना उध्दार होत नाही. म्हणून तुम्ही आमच्या केबीनमध्ये या. जे तीन-चार लोकांचे केबीन आहे ते बंद करा. सध्या कॉंग्रेसच्या गटनेत्यांची केबीन आहे.

**कैलासबेन जानी :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील, तुम्ही सगळ्या बाबतीत सहकार्य करा.

**रतन पाटील :-**

आमचेसुध्दा तेच म्हणणे आहे.

**कैलासबेन जानी :-**

मग तुम्ही सहकारी पक्ष असे का म्हणता? विरोधी पक्ष म्हणा. एका बाजूने सहकार्य का देता?

**मोहन पाटील :-**

तुम्ही विरोधी पक्ष असे बोलायला लावू नका. त्यामुळे बहूमताने काम करावे लागेल.

**गजानन भोईर :-**

विरोधी पक्ष बोलले तरी चालेल.

**मोहन पाटील :-**

असे चालणार नाही.

**रतन पाटील :-**

तुम्ही आम्हाला संपूर्ण सहकार्य करा.

**मोहन पाटील :-**

आम्ही संपूर्णपणे सहकार्य करित आहोत.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील, तुमची जरा चुक होते. आपला नगरसेवक पदाचा कार्यकाल संपेपर्यंत शिवसेना राहिल का? हा प्रश्न उद्‌भवलेला आहे.

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील, तुम्ही शिवसेने संदर्भात असे कसे बोलता? शिवसेना काल होती, आजसुध्दा आहे. आपण मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये शिवसेना स्थापन केली आहे. आता या ठिकाणी बसलेले माजी सभापती श्री. मोहन पाटील यांचा मिरा भाईंदर शहरामध्ये शिवसेना स्थापन करण्यासाठी पुढाकार होता. आज या ठिकाणी बसलेले बहूसंख्य पदाधिकारी शिवसेनेचे आहेत.

**मोहन पाटील :-**

लोक तुमच्यापासून लांब पळतात याला काय कारण आहे? तुमची नितीमत्ता बदलत चाललेली आहे. तुम्ही तुमची ध्येय, धोरणे धुळीला लावलेली आहेत. मा. आयुक्त साहेब, सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील यांनी त्यांचे विचार मांडलेले आहेत. त्या विषयावर चर्चा झाली पाहिजे. कारण आम्हाला तीन लोकांना इलेक्ट्रीसिटी द्यावी लागत आहे, तीन लोकांना फोन द्यावा लागत आहे, तीन लोकांना शिपाई द्यावा लागत आहे. त्यापेक्षा शहर विकास आघाडी, शिवसेना, जनता दल या तिन्ही पक्षांच्या लोकांना एकत्र करा आणि एकाच केबीनमध्ये तीन वेगवेगळी टेबले द्या. मुंबई महानगरपालिकेमध्ये एकाच दालनात वेगवेगळ्या पक्षाच्या लोकांना तीन वेगवेगळे टेबल आहेत. ती लोक त्या टेबलावर बसून कामकाज करीत आहेत.

**कैलासबेन जानी :-**

समजा, पुढच्यावेळी सदस्य संख्या पंधरा झाली तर लहान केबीन मोठी होईल का?

**मोहन पाटील :-**

असे झाले तर छोटी केबीन मोठी हाईल.

**एस. ए. खान :-**

मा. सभापती साहेब, परसेन्टेजच्या हिशोबाने सदस्यांची संख्या घ्या.

**मोहन पाटील :-**

आपल्याला छोटी केबीन मोठी करावी लागेल.

**रतन पाटील :-**

तुम्ही कायदा बघून केबीन करा.

**ग्रिटा फॅरो :-**

केबीन देणे हे सन्मा. सदस्यांच्या टक्केवारीवर अवलंबून आहे.

**केलासबेन जानी :-**

मी सन्मा. सदस्यांच्या टक्केवारीबाबत बोलत आहे. एकदा गटनेत्यांना केबीन दिली की ती काढता येत नाही.

**मा. आयुक्त :-**

त्या ठिकाणी जागा उपलब्ध नाही.

**कैलासबेन जानी :-**

तिथे जागाच उपलब्ध नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, गटनेत्याचे केबीन द्यायला कॅन्टीनची जागा सोयीस्कर आहे. कारण सध्या कॅन्टीन बंद आहे. आपल्याला वर्षभर कॅन्टीनचा उपयोग होत नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, हा विषय पुढच्या मिटींगला घ्या.

**मोहन पाटील :-**

हा विषय पुढच्या मिटींगला घेण्यापूर्वी महासभेला घेण्यात यावा. तीन-चार लोकांना सहकारी पक्ष असे सांगुनसुध्दा ते केबीन मान्य करित नाहीत. त्यासाठी आपण विरोधी पक्ष म्हणूण काम करुया आणि ठराव

मांडूया. कारण तीन-चार लोकांना वेगळे केबीन देण्यापेक्षा आपण एकाच केबीनमध्ये तीन-चार लोकांना बसवू. आपण त्या लोकांना तेवढा अवधी देऊया.

**रतन पाटील :-**

साहेब, आम्ही महापालिकेच्या प्रांगणात बसायला तयार आहोत. आम्हाला लोकांची सेवा करायची असेल तर आम्ही कुठूनही सेवा करु शकतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

या लोकांना केबीनची आवश्यकता नाही असे मला वाटते.

**मोहन पाटील :-**

तुम्हाला जसे योग्य वाटेल तसे करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, सहकारी पक्षाने आम्हाला केबीनची आवश्यकता नाही, आम्ही प्रांगणामध्ये बसू असे मान्य केलेले आहे. त्यामुळे आपण यांची केबीन कॉंग्रेसवाल्यांना देऊया.

**मोहन पाटील :-**

आम्ही याबाबत ठराव करु शकतो.

**रतन पाटील :-**

तुम्ही याबाबत ठराव करा.

**मोहन पाटील :-**

आपण सदरचा विषय महासभेत घ्यावा अशी मी शिफारस करित आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

या ठरावास माझे अनुमोन आहे.

**एस. ए. खान :-**

आपण सहकारी पक्षाचा एक मोठी केबीन देऊया. प्रत्येक सहकारी पक्षाने दोन-दोन दिवस बसायचे असे ठरवूया.

**रतन पाटील :-**

सगळे वाढलेले आहे मग तुम्हाला दहा केबीन असतील तर अजून केबीन वाढवा.

**कैलासबेन जानी :-**

तुम्ही महासभेला हा विषय कशाला आणता? मा. सभापतींनी विषय आणायचा आणि परत विषय घ्यायचा नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

सन्मा. सदस्या कैलासबेन जानी यांना केबीन मिळेल.

**कैलासबेन जानी :-**

आम्ही सोळा सदस्य आहोत. आम्हाला केबीन मिळाली पाहिजे.

**मोहन पाटील :-**

हा धोरणात्मक निर्णय असल्यामुळे हा विषय महासभेत घेतला जाईल.

**प्रकरण क्र. १८७ :-**

कॉंग्रेस (आय) पक्षाच्या गटनेता करीता मोठी कॅबिन उपलब्ध करुन देणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. १९३ :-**

**संदर्भ :-श्री. हंसुकुमार पांडे, गटनेता (कॉंग्रेस, आय) यांचेकडील दि. २०/१२/२००५ चे पत्र.**

वरील संदर्भिय विषयानुसार श्री. हंसूकुमार पांडे, गटनेता, कॉंग्रेस (आय) यांचे पत्र सोबत जोडलेले असून त्यांनी कॉंग्रेस पक्षाचे २३ सदस्य असल्याने गटनेत्याकरीता उपलब्ध असलेल्या कॅबिन मधील जागा अपुरी असल्याने मोठी कॅबिन उपलब्ध करुन देण्याची मागणी केलेली आहे. गटनेत्याकरीता तळमजल्यावरच कॅबिनची व्यवस्था असून सदर ठिकाणी मोठी कॅबिन उपलब्ध करुन देण्याकरीता जागा नाही, त्यामुळे सद्यस्थितीत मोठी कॅबिन उपलब्ध करुन देता येणार नाही, असा प्रस्ताव आयुक्त यांनी ठेवला आहे. सध्या जागा उपलब्ध नसून सर्व गट नेत्यांना वाटप केलेल्या जागेबाबत फेरविचार करुन निर्णय घेण्याकरिता मा. महासभेपुढे विषय ठेवण्यांत यावा.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १८८ चे वाचन केले.)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आपल्याला सदरहू जागा हस्तांतरित झालेली आहे का?

**गजानन भोईर :-**

या जागेचा बिल्डर कोण होता? मालक कोण होता? त्याला टी.डी.आर. दिलेला आहे की नाही? ती जागा आपल्याकडे कश्याप्रकारे हस्तांतरित झालेली आहे? त्याने ती जागा वापरलेली आहे का? या सर्व गोष्टींचा गोषवा-यामध्ये उल्लेख नसतो. गोषवारा संपूर्णपणे यायला पाहिजे. ती जागा अतिक्रमणाच्या मालकांची होती. ती जागा वापरलेली आहे. ती आपल्या ताब्यात आहे. आपल्या गोषवा-यामध्ये याचा उल्लेख केलेला नाही.

**रतन पाटील :-**

मागच्या वेळेला आपण आरक्षणाची जागा ताब्यात घेण्याबाबतचा ठराव स्थायी समितीमध्ये झालेला होता.

**कैलासबेन जानी :-**

त्या जागेचे क्षेत्रफळ किती आहे? ती जागा किती एकर आहे याचा काहीही उल्लेख केलेला नाही.

**रतन पाटील :-**

आरक्षणाची जागा हस्तांतरित करुन महापालिकेच्या ताब्यात देण्याबाबतचा ठराव मागच्या वेळेला झालेला होता. आपल्याकडे ही जागा अशा पध्दतीने आलेली आहे का? किंवा ही जागा अशा पध्दतीने हस्तांतरित झालेली आहे का? प्रथम त्याबाबत सविस्तर माहिती द्यावी.

**प्रेमनाथ पाटील :-**

हा विषय पुढच्या मिटींगला घ्या.

**रतन पाटील :-**

हा विषय पुढच्या मिटींगला का घ्यायचा?

**गजानन भोईर :-**

हा विषय पुढच्या मिटींगला घेऊया.

**रतन पाटील :-**

या विषयाचा गोषवारा दिलेला नसल्यामुळे हा विषय पुढच्या मिटींगमध्ये घेतला तर चालेल. या विषयाचा संपूर्ण गोषवारा आणूण हा विषय पुढच्या मिटींगला घेऊया.

**गजानन भोईर :-**

मला या ठिकाणी एक सुधारणा सुचवायची आहे. सध्या आरक्षण क्र. १२२, आरक्षण क्र. १७० मध्ये अतिक्रमण झालेले आहे. आपण ती अतिक्रमणे काढलेली होती. आता पुन्हा त्या जागेवर अतिक्रमण झालेले आहे. आपण आरक्षण हल्लीच करुन घेतो आणि त्याच्यावर अतिक्रमण होते. आपण ते अतिक्रमण पाडायला जातो किंवा अतिक्रमण एकदा तोडले की पुन्हा होते. आता संपूर्ण आरक्षणावर कंपाऊंड राहू दे. शिवार गार्डनच्या मागे अतिक्रमण झालेले आहे. सोनाली हॉटेलच्या मागे म्हणजे आरक्षण क्र.१७० मध्ये अतिक्रमण केलेले आहे. ते अतिक्रमण हटविले पाहिजे. कारण त्या ठिकाणी झोपड्या बांधल्या जातात. आरक्षण क्र.१२२, आरक्षण क्र. १७० म्हणजे सोनाली हॉटेलच्या मागे आणि शिवार गार्डनच्या मागचे आरक्षण हटविण्याबाबत लवकरात लवकर कारवाई करा. ही जागा राहिलेली आहे का? हे जे आरक्षण क्र.१६२ उद्यानाचे राखीव आहे. त्याबाबत मी बोलत आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आपण सुभाषचंद्र बोस मैदानसमोर जे सर्कल बनविलेले आहे. त्याच्यामध्ये भरपुर झोपडपट्टी वाढवलेली आहे. त्याच्यावर काही उपाययोजना करायची आहे की नाही ते सांगा.

**मा. आयुक्त :-**

ती झोपडपट्टी काढायची आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही ती झोपडपट्टी कधी काढणार? कारण आपली नगरपालिका त्या लोकांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करित आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही त्या लोकांना सुविधा का पुरविता? तुम्ही त्या लोकांना सुविधा पुरवु नका.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही त्या लोकांना सुविधा पुरवु नका.

**मोहन पाटील :-**

आपल्या शहरात झोपडपट्टीमध्ये जी लोक राहतात, त्या लोकांना पाणी देणे हे आपले कर्तव्य आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, कधी गाडीचे ॲक्सिडन्ट वगैरे झाले तर आपल्याला त्याचा धोका संभवतो.

**मोहन पाटील :-**

त्या झोपडपट्टीतील लोकांना पाणी द्यायचे नाही हे दुसऱ्या कोणी बोलले तर चालेल. परंतु, आपण बोलून चालणार नाही. आपण त्या लोकांना पाणी दिले पाहिजे.

**गजानन भोईर :-**

ह्या झोपड्या काल बसवलेल्या असल्या तरी त्यांना पाणी महापालिकाच देते असे तुम्ही बोलू शकत नाहीत का?

**रतन पाटील :-**

ती झोपडपट्टी वाढत गेलेली आहे.

**मोहन पाटील :-**

ती झोपडपट्टी वाढली असली तरी आपण त्या झोपडपट्टीचे पाणी बंद करु शकत नाही.

**रतन पाटील :-**

परंतु, ह्याच्यावर उपाय काय आहे?

**मोहन पाटील :-**

प्रशासनाने ह्याच्यावर उपाययोजना आखली पाहिजे. त्याच्यावर कार्यवाही केली पाहिजे.

**प्रेमनाथ पाटील :-**

भाईंदर वेस्टला राहणारे पुष्कळ नगरसेवक आहेत. उद्या त्या ठिकाणी गाडीचे ॲक्सिडन्ट झाले तर त्याला कोण जबाबदार आहे?

**रतन पाटील :-**

सगळी मुले रस्त्यावर खेळत असतात, फिरत असतात. तिथे बायका कपडे धुत असतात.

**मा. आयुक्त :-**

त्या जागेवर कोणी टपऱ्या वगैरे ठेवण्यापेक्षा ती जागा अव्हेलेबल असल्यामुळे वापरायला हरकत नाही. नाहीतर कोणीतरी येऊन त्या जागेवर अतिक्रमण करेल.

**गजानन भोईर :-**

आपण आरक्षण क्र. १२२ चे अतिक्रमण तोडले होते. तिथे पुन्हा झोपड्या बांधलेल्या आहेत.

**मा. आयुक्त :-**

ज्या जागेवर अतिक्रमण झालेले आहे. आपण ते अतिक्रमण तोडूया. या ठिकाणी तो मुद्दा उपस्थित झालेला नाही. परंतु आज आपल्याकडे जी जागा रिकामी आहे. त्या जागेला सुरक्षित ठेवले तर बिघडत नाही.

**रतन पाटील :-**

जागा हस्तांतरीत झालेली आहे का?

**जयंत पाटील :-**

जागा हस्तांतरीत झालेली आहे का?

**गजानन भोईर :-**

जागेच्या मालकाने जागा हस्तांतरीत केलेली आहे का? त्या जागेवर कोणाचे नांव वगैरे आहे का? आपण त्याला टी.डी.आर. दिलेला आहे का?

**जयंत पाटील :-**

त्या जागेच्या मालकाला आपल्याकडून टी.डी.आर. दिलेला आहे का?

**गजानन भोईर :-**

त्या जागेच्या मालकाने जागा वापरली किंवा टी.डी.आर. वापरलेला आहे की नाही ते काही नमुद केलेले नाही.

**जयंत पाटील :-**

जर आपल्याकडे जागा हस्तांतरीत झाली नसेल तर आपण खर्च करु शकत नाही.

**मोहन पाटील :-**

मा. सभापती महोदय, तुम्ही ही माहिती सभागृहापुढे आणा. सभागृहाला ही माहिती मिळणे आवश्यक आहे. परंतु, प्रशासकिय व आर्थिक मंजूरी देऊन हा विषय मंजुर केला असा याचा अर्थ होत नाही. आपल्याला जागेचे काम सुरु करावे असा होऊ शकत नाही. आपल्याला त्या विषयाला प्रशासकिय व आर्थिक मंजूरी द्यायला हरकत नाही. परंतु, या विषयाची सविस्तर माहिती मिळणे आवश्यक आहे.

**जयंत पाटील :-**

प्रथम या विषयाची माहिती द्या.

**गजानन भोईर :-**

तुम्ही प्रथम या विषयाची माहिती द्या. कारण आपण हा विषय अर्धवट मंजूर करु शकत नाही.

**मोहन पाटील :-**

विषय मंजूर करणे म्हणजे काम सुरु करणे असा अर्थ होत नाही. ही प्रशासकिय व आर्थिक मंजूरी आहे.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील, तुम्ही या विषयाबाबत घाई कशाला करता?

**केशव घरत :-**

तुम्ही हा विषय पुढच्या मिटींगला घ्या.

**जयंत पाटील :-**

तुम्ही या विषयाबाबत संपूर्ण माहिती मागवा.

**गजानन भोईर :-**

याच्यामध्ये सुधारीत आरक्षण घ्या. फक्त आरक्षण क्र. १६२ घेऊ नका.  आरक्षण क्र. १२२ आणि आरक्षण क्र. १७० सुध्दा घ्या.

**रतन पाटील :-**

सगळी आरक्षणे घ्या. ज्य-ज्या ठिकाणी मार्केटची आरक्षणे आहेत, तुम्ही ती सगळी आरक्षणे घ्या आणि डेव्हलपमेन्ट करा. मिरा भाईंदरमध्ये एकही मार्केट नाही.

**जयंत पाटील :-**

जोपर्यंत तुमच्या ताब्यात जागा येत नाही, तोपर्यंत आम्हाला काहीही करता येणार नाही. तुमच्या ताब्यात जागा येणे आवश्यक आहे.

**गजानन भोईर :-**

आता जागेचे काय स्वरुप आहे? ते सांगा. आपण त्या जागेला टी.डी.आर. देणार आहात का?

**कैलासबेन जानी :-**

त्या जागेचे क्षेत्रफळ किती आहे? ती जागा किती एकर आहे? ते काहीही नमुद केलेले नाही.

**जयंत पाटील :-**

ती लोक त्या चार हजार स्क्वेअर फुट जागेचे मालक आहेत. त्या जागेचे जे कोणी मालक असतील त्यांच्याबरोबर अॅग्रीमेन्ट वगैरे झालेले आहे का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण उद्यानाची जागा हस्तांतरीत करुन घेतो. ही जागा हस्तांतरीत करीत असताना त्या बिल्डरने लॅन्ड फिलिंग आणि वॉल कम्पाउन्ड करुन देणे असा नियम आहे असे मला वाटते. हे सर्व काही झाल्यानंतर आपण त्या बिल्डरला टी.डी.आर. देतो.

**मा. आयुक्त :-**

समजा, टी.डी.आर. देण्याचा नियम असला तरी आपल्याला तो बिल्डर जागा विकसित करुन देणार आहे. आपल्याला तो बिल्डर कुठली जागा विकसित करुन देणार आहे ते समजण्याच्या दृष्टीने आपण त्या बिल्डरवर तसे कम्प्लशन करायला पाहिजे. त्या बिल्डरने जी काही ठराविक जागा विकसित करुन द्यायची असेल तर त्या बिल्डरवर ती ठराविक जागा विकसित करण्याचे कम्प्लशन टाकणे आवश्यक आहे. समजा, त्या जागेवर ठराविक भराव करायला लागला तर तो भराव बिल्डर करु शकतो. आपण आपल्या पध्दतीने प्लानिंग करीत असतो. आपल्याला ज्या पध्दतीने उद्यानाचा विकास करणे योग्य वाटत असेल, आपण त्या पध्दतीने उद्यानाचा विकास करायचा आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, भरणी करुन कंपाउन्ड वॉलवर गेट लावून देण्याचे काम त्या बिल्डरचे आहे.

**गजानन भोईर :-**

आपण त्या बिल्डरला टी.डी.आर. दिलेला आहे का?

**मा. आयुक्त :-**

आपण त्या बिल्डरला टी.डी.आर. दिलेला आहे असे मला वाटते.

**सुर्यकांत भोईर :-**

जर त्या बिल्डरला टी.डी.आर. दिला असेल तर त्या बिल्डरनेच कंपाउन्ड केले पाहिजे. आणि त्या भरणी केली पाहिजे.

**जयंत पाटील :-**

ज्या बिल्डरला टी.डी.आर. दिलेला आहे. त्याचे नाव काय आहे.

**मा. आयुक्त :-**

माझ्यामते त्या बिल्डरचे नांव आर.एन.ए. बिल्डर आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण त्याच्यासाठी रु. १४ लाख का खर्च करायचे?

**जयंत पाटील :-**

त्या बिल्डरचे काय कागदपत्रे आहेत? ते बघणे सभागृहाची जबाबदारी आहे.

**गजानन भोईर :-**

बांधकाम विभागाचे जे कोणी संबंधित अधिकारी असतील त्यांनी या विषयाचे उत्तर द्यावे.

**जयंत पाटील :-**

बांधकाम विभागाच्या अधिका-यांकडून त्या बिल्डरच्या सर्व कागदपत्रांची माहिती मागवा.

**मा. आयुक्त :-**

टाऊन प्लानिंगच्या अधिका-यांना बोलविण्यात यावे.

**रतन पाटील :-**

जे टाऊन प्लानिंगचे अधिकारी उपस्थित नसतील किंवा त्यांच्याकडे आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध नसतील तर हा विषय पुढच्या मिटींगला घेण्यांत यावा.

**सुर्यकांत भोईर :-**

जर त्या बिल्डरने टी.डी.आर. घेतला असेल तर भरणी करण्याचे काम त्या बिल्डरचेच आहे.

**प्रकरण क्र. १८८ :-**

प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. १९४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत भाईंदर (पू.) उड्डाणपूल जंक्शन जवळील आरक्षण क्रमांक १६२ उद्यानाकरिता राखीव असून सदर ठिकाणी उद्यान विकसित करावयाचे आहे. सदर उद्यान विकसित कामे करीता कुंपनभिंत, रेलिंग, कॉंक्रीट पायवाटा व इतर आवश्यक कामे करावयाची आहेत. सदर कामी रु. १४,६०,७३०/- एवढ्या रक्कमेचे अंदाजपत्रकास तयार करण्यांत आलेले असून सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. सुर्यकांत भोईर. अनुमोदक :- श्री. एस्. ए. खान.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १८९ चे वाचन केले.)

(सन्मा सदस्य श्री. मोहन पाटील यांनी ठरावाचे वाचन केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

तुम्ही या ठिकाणी एक डम्पर सांगता आणि ठरावामध्ये दोन डम्पर लिहिलं. हे योग्य नाही. तुम्ही हे दोन डम्पर चुकीचे लिहिले आहेत असे तुम्हाला म्हणायचे आहे का?

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील, आपल्याला दोन डम्परची आवश्यकता आहे. सन्मा. सदस्य रतन पाटील साहेब, तुम्ही जबाबदार पक्षाचे गटनेते आहात. मी आपल्या केबिनला हात घालत नाही.

**रतन पाटील :-**

तुम्ही सहकार्याच्या भुमिकेविषयी बोला.

**मोहन पाटील :-**

तुम्ही आम्हाला ज्या पध्दतीने बोललात त्याच पध्दतीने आम्ही तुम्हाला सांगतो. ज्या गावच्या बोरी त्याच गावच्या बाभळी. पाटील साहेबांच्या म्हणण्यानुसार तुम्ही ज्या पक्षामध्ये होतात, त्या पक्षाची मला पाळमुळं माहिती आहेत. मी त्या पक्षातुन आलेलो आहे. त्यामुळे तुम्हाला जे काही बोलायचे आहे ते आम्ही करु शकतो. म्हणजे आम्ही चार गावचे पाणी प्यायलेलो आहोत. तुम्हाला एका गावाचे पाणी पीता येत नाही. म्हणूण लोक तुमच्या पक्षातुन बाहेर पडत चाललेली आहेत. तुम्हाला ते पाणी पचलेले नाही.

**रतन पाटील :-**

याचा अर्थ तुम्ही चार गावचे पाणी प्यायला गेले होते. आम्ही पाणी प्यायला गेलेलो नाही.

**मोहन पाटील :-**

आम्ही तुम्हाला सत्ताधारी म्हणूण काम करुन दाखवून देऊ शकतो असे आमचे म्हणणे आहे. परंतु, तुम्ही मला तो शब्द वापरायला लावू नका.

**रतन पाटील :-**

तुम्ही हा शब्द बोललात म्हणून मला बोलावे लागले.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील, प्रशासनाने गोषवारा दिल्यानंतर आपल्याला ठराव मांडण्याचा अधिकार आहे. आपल्याला प्रशासन गोषवारा देते. आपण त्या गोषवा-यामध्ये कोणत्या पध्दतीने ठराव मांडायचा हा तुमचा, आमचा म्हणजेच सगळ्यांचा अधिकार आहे. आपल्याला माणसांची कमतरता भासत असल्यामुळे मी दोन डम्पर आणि पन्नास माणसे कामाला लावून कचरा उचलण्याचे काम केले जाईल.

**गजानन भोईर :-**

गोषवा-यामध्ये एक डम्पर लिहलेले आहे आणि तुम्ही ठरावामध्ये दोन डम्परचा उल्लेख केलेला आहे. गोषवा-यामध्ये दोन डम्परचा उल्लेख केलेला आहे. गोषवा-यामध्ये एक डम्पर लिहिला ती प्रिन्टीग मिस्टेक आहे का? की तुम्ही ठरावामध्ये अजून एक डम्पर वाढविला आहे. असे काही आहे का?

**मोहन पाटील :-**

आपण ठरावामध्ये एक डम्पर वाढविलेला आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, या ठिकाणी ठराव झालेला आहे. आम्ही ठराव नाकारत नाही.

**कैलासबेन जानी :-**

साहेब, आपण स्टेशनला फुटपाथ बनविलेला आहे. संध्याकाळच्या वेळेला फुटपाथवर बसतात. तसेच, त्या फुटपाथवर भाजीमार्केट लावले जाते. शिवाय, काही लोक कपडे घेऊन विकायला बसतात आणि काही लोकांनी ते फुटपाथ कव्हरिंग केलेले आहे. तुम्ही ते अतिक्रमण कधी हटविणार ते सांगा?

**गजानन भोईर :-**

साहेब, मी तुमच्या निदर्शनास आणूण देतो की, समजा एखादा हातगाडीवाला एखाद्या जागेवर हातगाडी लावून आपला धंदा चालवत असेल तर तो माणूस ती जागा, त्याच्या हातगाडीसहित हातगाडीवाल्याला रु. दोन लाख ते अडीच लाखापर्यंत विकतो. जुना हातगाडीवाला हळूहळू पाच-सहा हातगाड्या लावता येईल एवढी जागा आपल्या ताब्यात घेतो. जो नविन हातगाडीवाला असतो, तो जुना झाल्यावर पाच-सहा हातगाड्या लावता येतील एवढी जागा त्याच्या ताब्यात घेतो. जर जुन्या हातगाडीवाल्याने ती जागा हातगाडीसहित रु. दीड लाखापर्यंत नविन हातगाडीवाल्याला विकली तरी ती जागा नविन हात गाडीवाल्यांची होऊ शकत नाही. कारण जुन्या हातगाडीवाल्याची जागा वाढत गेलेली असते. मा. सभापती साहेब, तुम्ही फेरीवाल्यांच्या गाड्यांना नंबर द्या आणि या गाड्या नंबरनुसार उचला. एकेका फेरीवाल्यांच्या पंधरा-पंधरा गाड्या आहेत. त्या हातगाडीवाल्याच्या मुलीचे लग्न जवळ आले की तो दोन गाड्या विकतो. मग त्याला रु. तीन लाख मिळतात. परंतु ती जागा महापालिकेची असते. तुम्ही त्याच्यावर नियंत्रण ठेवायला सांगा.

**एस. ए. खान :-**

सगळीकडे असेच चाललेले आहे.

**मा. सभापती :-**

या विषयावर माझे स्वतःचे असे मत आहे की, ज्या फेरीवाल्यांकडे पंधरा वर्षापेक्षा स्थायिक असल्याबद्दल रेशनकार्डचा पुरावा असेल तर अशा लोकांना शहरात भाजी विकायला किंवा इतर धंदा करायला प्राधान्य द्यायचे. बाकीच्या फेरीवाल्यांना हाकलण्यात यावे.

**प्रेमनाथ पाटील :-**

तसा मुद्दा नाही.

**जयंत पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही जे काही बोलता आमचा तसा उद्देश नाही. परंतु, आपण काही रस्त्यावर ना फेरीवाला क्षेत्र असे डिक्लेअर केलेले असताना ते भाजीवाले तिथे बसण्याचा प्रश्न येत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण ना फेरीवाला क्षेत्र म्हणून डिक्लेअर केलेले आहे. म्हणून ती लोक तिथे बसु शकत नाहीत.

**मा. सभापती :-**

ना फेरीवाला क्षेत्र डिक्लेअर केल्यावर फेरीवाल्यांनी तिथे बसण्याचा प्रश्न येत नाही.

**एस. ए. खान :-**

फेरीवाल्यांचे प्रमाण वाढत चाललेले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, ना फेरीवाला क्षेत्र मध्ये बाजार फी कलेक्ट करु शकतात का?

**गजानन भोईर :-**

ना फेरीवाला क्षेत्र मध्ये फेरीवाले बसु शकत नाहीत. त्यामुळे फी कलेक्ट करण्याचा प्रश्नच येत नाही.

**ग्रिटा फॅरो :-**

हा प्रश्न गेल्या वेळेलासुध्दा विचारलेला होता.

**प्रेमनाथ पाटील :-**

मी हा प्रश्न गेल्या वेळेलासुध्दा विचारलेला होता. परंतु, मला अजूनपर्यंत त्या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही. त्यामुळे मला हा प्रश्न पुन्हा विचारावा लागत आहे. आपण ना फेरीवाला क्षेत्रमध्ये बाजार फी कशी कलेक्ट करु शकतो? ते सांगा.

**मा. आयुक्त :-**

ना फेरीवाला क्षेत्र मध्ये बाजार फी कलेक्ट करु शकत नाही.

**गजानन भोईर :-**

ना फेरीवाला क्षेत्र मध्ये फेरीवाल्यांनी बसु नये.

**जयंत पाटील :-**

मुळात ना फेरीवाला क्षेत्र मध्ये फेरीवाले बसण्याचा प्रश्नच येत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

ना फेरीवाला क्षेत्र मध्ये फेरीवाले बसण्याचा प्रश्नच येत नाही.

**गजानन भोईर :-**

अमुक-अमुक ठिकाणी फेरीवाल्यांनी बसु नये म्हणूण त्या ठिकाणी ना फेरीवाला क्षेत्र असे बोर्ड लावण्याचे महानगरपालिकेचे काम आहे. मग तिथे फेरीवाले बसणार नाहीत. त्यामुळे बाजार फी वसुल करण्याचा प्रश्न येणार नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

महानगरपालिकेने ना फेरीवाला क्षेत्रचे बोर्ड बनविलेले आहेत. ते बोर्ड शोसाठी बनविलेले आहेत का?

**एस. ए. खान :-**

महानगरपालिकेने 'ना फेरीवाला क्षेत्र'चे बोर्ड बनविलेले आहेत.

**गजानन भोईर :-**

प्रथम त्या जागांवर 'ना फेरीवाला क्षेत्र'चे बोर्ड लावले पाहिजे. 'ना फेरीवाला क्षेत्र'चे बोर्ड लागल्यानंतर फेरीवाले अतिक्रमण उचलतील.

**प्रेमनाथ पाटील :-**

सध्या फेरीवाल्यांचा विषय बाजूला ठेवा. परंतु, दुकानदारांकडून पैसे का कलेक्ट केले जातात? ते सांगा.

**कैलासबेन जानी :-**

दुकानदारांकडून पैसे कलेक्ट केले तर दुकानदार काय करणार आहेत?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, 'ना फेरीवाला क्षेत्र'चे बोर्ड तसेच पडलेले आहेत.

**गजानन भोईर :-**

मा. आयुक्त साहेब, जर अतिक्रमण विषयी काय प्रॉब्लम आला तर आम्ही कोणाकडे जायचे ते आम्हाला सांगा. आम्ही प्रभाग अधिकाऱ्यांकडे जाणे योग्य आहे की, मा. उपायुक्त श्री. अजिज शेख साहेबांकडे जाणे योग्य आहे ते सांगा.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही अतिक्रमणविषयी मा. उपायुक्त श्री. अजिज शेख यांच्याकडे जाणे योग्य होईल.

**गजानन भोईर :-**

परंतु, तुम्ही अतिक्रमण विषयीच्या पॉवर्स प्रभाग अधिकाऱ्यांनासुध्दा दिलेल्या आहेत.

**मा. आयुक्त :-**

माझ्या माहितीप्रमाणे आपण आपल्या क्षेत्रातील सर्व ठिकाणी 'ना फेरीवाला क्षेत्र'चे बोर्ड लावलेले आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण सर्व ठिकाणी 'ना फेरीवाला क्षेत्र'चे बोर्ड लावलेले नाहीत.

**मा. आयुक्त :-**

काही ठिकाणी 'ना फेरीवाला क्षेत्र'चे बोर्ड लावण्याचे काम पेन्डिग राहिले असण्याची शक्यता आहे. त्या ठिकाणी 'ना फेरीवाला क्षेत्र'चे बोर्ड लावले जातील.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आपल्या महापालिकेत 'ना फेरीवाला क्षेत्र'चे बोर्ड पेन्डिग पडलेले आहेत. त्या बोर्डाचे बिल दिलेले नाही. त्या बोर्डाबाबतचा ठराव पास झालेला होता. तुम्ही अतिक्रमण विभागाच्या अधिका-यांना विचारा. तुम्हाला ते सर्व माहिती देतील.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, मा. उपायुक्त श्री. अजिज शेख साहेबांच्या ऑफिसच्या उजव्या बाजूला तिस-या मजल्यावर जाऊन बघा. तुम्हाला ते बोर्ड तिथे तसेच पडलेले असल्याचे आढळुन येईल.

**अजिज शेख (मा. उपायुक्त साो.) :-**

मी या विषयाबाबत थोडीशी माहिती देऊ इच्छितो. आपण पस्तीस मजूर घेणार आहोत.

**प्रेमनाथ पाटील :-**

आता ठराव केला त्याच्यामध्ये पस्तीस मजूराऐवजी पन्नास मजूर नमुद केलेले आहेत.

**अजिज शेख (मा. उपायुक्त साो.) :-**

आपण ठरावात पन्नास मजूर नमुद केले ही वेगळी गोष्ट आहे. परंतु, पस्तीस मजूर आणि एक डम्पर असा आपण स्कॉड तयार करुन प्रत्येक विभागासाठी किंवा प्रभाग अधिका-यांच्या नियंत्रणाखाली स्कॉड तयार करण्याचे कामसुध्दा केलेले आहे. आपण मिरारोड आणि भाईंदर ईस्टला बारा-बारा मजूर दिलेले आहेत. आणि इतर ठिकाणी सहा आणि पाच असे मजूर दिलेले आहेत. आपण जो स्कॉड तयार केलेला आहे, त्याच्यसाठी स्कॉड प्रमुख नेमुन दिलेला आहे. ही संपूर्ण कार्यवाही प्रभाग अधिका-याने त्याने स्वतःच्या नियंत्रणाखाली करुन घेणे आवश्यक आहे. आपण इमिजिएट अधिकार प्रभाग अधिका-यांना दिलेले आहेत. परंतु, जर ह्याच्यामध्ये पॉलिसी टाईपचे काही मॅटर असेल तर ते मॅटर आमच्याकडे येऊ शकेल. परंतु, आपण सर्व अधिकार प्रभाग अधिका-यांना दिलेले आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही संपूर्ण ॲथोरिटी प्रभाग अधिका-यांना दिलेली आहे का?

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईर जरा एक मिनिट थांबा. मा. उपायुक्त अजिज शेख साहेब, तुम्ही ह्याच्यामध्ये एक सुधारणा करुन घ्या की, तुम्ही जे प्रभाग अधिकारी नेमलेले आहेत त्यांना तुम्ही एका जागेवर राहण्यासाठी कमीत कमी पंधरा दिवसांचा कालावधी द्या. पंधरा दिवसांपेक्षा जास्त कालावधी झाल्यास त्याची बदली करा.

**सुर्यकांत भोईर :-**

प्रत्येक वर्षी प्रभाग अधिका-याची बदली झाली पाहिजे.

**प्रेमनाथ पाटील :-**

प्रभाग अधिका-याची बदली प्रत्येक वर्षी न करता प्रत्येक आठवड्यात करण्यात यावी.

**रतन पाटील :-**

साहेब, माझी या ठिकाणी एक सुचना आहे की, आपले जे अतिक्रमण विभागाचे अधिकारी आहेत ते अधिकारी व्यवस्थितरित्या काम करित आहेत. परंतु, त्या अधिका-यांकडे असणारा जो तुटपूंजा कर्मचारी वर्ग आहे, त्यांच्याकडून व्यवस्थितरित्या कार्यवाही होत नाही. तुम्ही एकत्रीतरित्या कार्यवाही करावी. म्हणजेच सर्व अधिकारी आणि कर्मचारी वर्गाने एकत्रीतरित्या कार्यवाही करावी.

**गजानन भोईर :-**

नवघर रोडला अतिक्रमण विभागाची गाडी जाण्यापूर्वी सगळ्या भाजीवाल्यांना आधीच फोन जातो. सगळी लोक दहा मिनिटांसाठी गाड्या उचलतात.

**मा. सभापती :-**

त्या ठिकाणी तसा धाक राहिलेला नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

मी मागच्या वेळेला सांगितले होते की, भाईंदर रोडला संध्याकाळी फुटपाथवर मच्छी किंवा भाजी वगैरे विकायला बसतात. अजूनपर्यंत त्याच्यावर कार्यवाही झालेली नाही. आपण तो रोड खुप चांगला आणि व्यवस्थित बनवलेला आहे. त्या रोडच्या फुटपाथवर मच्छीवाले वगैरे बसतात ते योग्य नाही. काशीमिरा रोडपासून संपूर्ण फुटपाथ फेरीवाल्यांनी व्यापलेले आहे.

**कैलासबेन जानी :-**

साहेब, प्रथम फुटपाथवरील अतिक्रमण हटवा.

**अजिज शेख (मा. उपायुक्त साो.) :-**

सध्या आपल्याकडे कर्मचारी वर्ग कमी आहे. परंतु, आपण आता पथक मागवून स्कॉड तयार केलेला आहे. आम्ही त्याच्यावर इमिजिएटली ॲक्शन घेऊ.

**मा. सभापती :-**

संपूर्ण रस्त्यावर जे मच्छीवाले बसतात. तुम्ही त्यांना एकदा वॉर्निंग द्या आणि नंतर पुन्हा बसायला देऊ नका.

**सुर्यकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही त्या मच्छीवाल्यांना कसली वॉर्निंग देता? तुम्ही त्या मच्छीवाल्यांना वॉर्निंग देऊ नका.

**मा. सभापती :-**

कोणी मच्छीवाले वगैरे बसलेले असतील तर नुकसान होता काम नये एवढेच माझे म्हणणे आहे.

**मा. आयुक्त :-**

हा विषय मंजूरीचा आहे.

**कैलासबेन जानी :-**

ह्या विषयाची मंजूरी झालेली आहे.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेब, आपले अधिकारी कार्यवाहीसाठी जाताना संध्याकाळची वेळ असते. त्यावेळेला आपल्या कार्यालयामध्ये कुठलाही जबाबदार अधिकारी हजर नसतो. आपल्या अतिक्रमण विभागाच्या गाडीवर फेरीवाल्यांनी मारहाण केल्याचे, हल्ला केल्याचे आणि दगडफेक केल्याचे दोन-तीन प्रकार घडलेले आहेत. जेव्हा अतिक्रमणाची कार्यवाही केली जाईल तेव्हा आपल्या महापालिकेचा जबाबदार अधिकारी अतिक्रमणची कार्यवाही करण्यासाठी असावा. जेणेकरुन तो अधिकारी अशा कुठल्याही कार्यवाहीला तोंड देईल आणि योग्यरितीने कार्यवाही करेल. आपल्याकडे कर्मचारी कमी आहेत. परंतु, तुम्ही एकत्रितरित्या कार्यवाही करा. जेणेकरुन काम फास्ट होईल आणि त्या कार्यवाहीला एक मार्ग मिळेल आणि निश्चितच एका विभागातील अतिक्रमण म्हणजेच सर्व फेरीवाले हटवता येतील. अतिक्रमण हटविण्याचे काम कमी कर्मचाऱ्यांमध्ये होत नाही. कारण एका विभागातुन अतिक्रमण हटविले की ते फरीवाले पुन्हा आपल्या गाड्या लावत जातात. म्हणूण अतिक्रमणवर एकत्रितरित्या काम करावे अशी माझी विनंती आहे.

**कैलासबेन जानी :-**

मा. सभापती साहेब, फुटपाथवर जे फेरीवाले बसतात, तुम्ही त्यांना पंधरा दिवसाची मुदत देऊन ते अतिक्रमण काढायला सांगा.

**जयंत पाटील :-**

आज आपण अतिक्रमणाचा अतिशय गंभीर विषय आणलेला आहे. आपण आज उल्हासनगरमध्ये काय चाललेले आहे ते बघत आहोत. आपण आता जी चर्चा करत आहोत त्याबद्दल मला असे सांगायचे आहे की, हा विषय रस्त्यावर बसलेले फेरीवाले आणि मच्छीवाले यांच्यापुरता मर्यादित नाही. जर आपल्याला संपूर्ण शहराचे आरोग्य सुरक्षित ठेवायचे असेल आणि लोकांना चांगल्याप्रकारे हवा, पाणी मिळावे असे वाटत असेल तर आपण अतिक्रमण या विषयाकडे गांभीर्याने बघितले पाहिजे असे माझे मत आहे. आपण अतिक्रमण विभागाला रसद पुरवित आहोत. त्यांना ताकद देण्याचा प्रयत्न करीत आहोत. परंतु, अतिक्रमण विभागाला इतर ताकद मा. आयुक्त साहेबांनी द्यावी लागेल. असे मी प्रामुख्याने सांगत आहे. या शहरातील अनेक नेते कुठल्याही पक्षाचे असोत, मला त्या नेत्यांशी काही देणे-घेणे नाही. हे नेते दबाव टाकूण चाळी बांधण्याचे प्रकार, अनधिकृत बांधकामे, इतर बाजार बसविणे याच्यामध्ये त्यांचे अर्थिक संबंध गुंतलेले आहेत. साहेब, जर तुमची स्वतःची मानसिकता असेल तर तुम्ही टी. चंद्रशेखर बनायला हरकत नाही. तुमची स्वतःची मानसिकता आहे असे मी गृहीत धरतो. हे शहर सुंदर झाले तर या शहरामध्ये आपले नांव कायम घेतले जाईल. श्री. अजिज शेख साहेबांनी माझ्या प्रभागातील प्रभाग क्र. ०८ आणि प्रभाग क्र.०९ यांच्यामधील चाळी चार दिवसांपूर्वी तोडल्याबद्दल मी त्यांचे या ठिकाणी अभिनंदन करतो. त्यांनी अतिशय चांगला निर्णय घेतलेला होता. आपल्या शहरात प्रचंड प्रमाणात चाळींचे बांधकाम चालू आहे.

**कैलासबेन जानी :-**

श्री. शिवमुर्ती नाईक साहेबांनी बरेचसे अतिक्रमण तोडले होते. तशी कारवाई झालेली होती.

**जयंत पाटील :-**

ह्याच्यामध्ये बिल्डरचे नुकसान होत नाही. ते कमाई करतात आणि निघुन जातात. म्हणजेच बांधकाम करणारा माणूस कमाई करतो आणि निघुन जातो. जो मध्यस्थी किंवा दलाल असतो तो तुरळक पैसे घेऊन जातो. आज उल्हासनगरमधील लाखो लोक बेघर होणार आहेत. त्यांचा काहीही दोष नाही. त्यांचा दोष एवढाच आहे की त्यांना ते फ्लॅट स्वस्तात मिळाले म्हणूण त्यांनी ते फ्लॅट विकत घेतले. ती बांधकामे कशी झाली? कालसुध्दा हायकोर्टाने मान्यता दिलेली नव्हती. डी.सी. रुलच्या मान्यतेबाबत बोललो तर शासन डी.सी. रुल बदलण्याचा प्रयत्न करीत आहे. हे असे किती दिवस चालणार आहे? आपल्याला लोक बाहेरुन आल्याचे सांगतात. पन्नास वर्षे झाली तरी नागरिक बाहेरुन आल्याचे सांगतात. माझ्यादृष्टीने तेसुध्दा चुकीचे आहे. या देशाचे प्रमुख नेता श्री. लालकृष्ण अडवाणी हेसुध्दा बाहेरुन आलेले आहेत. परंतु ते अशाप्रकारची मान्यता देणार नाहीत. आण या शहरासाठी अतिशय प्रामाणिकपणे काम केले तर इथली जनता आपले आभार

निश्चितपणे मानेल असे मला या ठिकाणी सांगावेसे वाटते. आपल्या क्षेत्रामध्ये खुप मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे चालू आहेत. मी या ठिकाणी माझेच एक उदाहरण देतो की, त्यावेळचे जे तात्कालीन अतिक्रमण विभागाचे अधिकारी होते मी त्यांना माझ्या प्रभागात बनणाऱ्या शंभर टक्के अनधिकृत असलेल्या बिल्डींगबाबत सांगितले होते. ह्या अनधिकृत बिल्डींग बनविणारा बिल्डर माझा जवळचा मित्र असल्याचेसुध्दा मी त्यांना सांगितले होत. मी तुम्हाला त्याबाबत काहीही डायरेक्ट सांगणार नाही. तुम्हाला जी काही कारवाई करायची असेल ती करा असे सांगितल्यावर दुसऱ्या दिवशी सकाळी त्या बिल्डरचा माणूस माझ्या आफिसमध्ये आला होता. तो बिल्डरचा माणूस मला बोलायला लागला की, सन्मा. सदस्य जयंत पाटील तुम्ही मला वाचवा. असा प्रकार या ठिकाणी चाललेला आहे. तुम्ही अनधिकृत बांधकाम तोडा किंवा तोडू नका. आम्ही सर्व नगरसेवक त्याबाबत काहीही बोलत नाही. कारण अनधिकृत बांधकाम करा असे सांगायला आम्ही या ठिकाणी येत नाही. त्यामुळे अनधिकृत बांधकाम तोडा असेदेखील मी सांगणार सांगणार नाही. ही संपूर्ण जबाबदारी शासनाची किंवा प्रशासनाची आहे. अतिक्रमण विभाग प्रशासनाच्या आखत्यरित काम करीत असतो. तुम्हाला नगरसेवकच हे काम चुकीचे चालत असल्याचे सांगतील. जर नगरपालिकेच्या नगरसेवकांनी अतिक्रमण तोडताना विरोध केला तर त्या नगरसेवकाचे नगरसेवक पद जाऊ शकते. कारण आम्ही बांधकामाला कुठलीही तडजोड करीत नाही किंवा हे बांधकाम झाले पाहिजे असे आम्ही सांगत नाही. परंतु, अनधिकृत बांधकाम तोडणे आणि या शहराची सुधारणा करणे हे आपले काम आहे. नगरसेवक या ठिकाणी पोटतिडकीने बोलत असतात. सन्मा सदस्य प्रेमनाथ पाटील सांगतात की, रस्त्यावर जे अतिक्रमण करुन बसतात तुम्ही त्या लोकांकडून पैसे घेऊ नका हे आपण मान्य करु शकतो. परंतु, ती लोक कसे बसतात? त्याचा विचार करा. मी एकदा प्रत्यक्ष बघितले की, अतिक्रमणाची लोक एका फेरीवाल्याची गाडी उचलायला गेले असताना जसे एखाद्या छोट्या मुलाला हातामध्ये केळी देतात तशाप्रकारे ती लोक त्यांची लोक त्यांच्या हातामध्ये गाडी देत होते. म्हणजे आपल्या प्रशासनाच्या कर्मचाऱ्यांचे तिकडे काहीतरी लागेबांधे आहेत. आपण जर अतिशय प्रामाणिकपणे काम केले तर हे अतिक्रमण हटविणे कठीण नाही. आज नवघर रोड, बी.पी. रोड संध्याकाळच्या वेळेला या रस्त्यावरुन चालणे अशक्य असते. मला दुर्देवाने असे म्हणावे लागेल की, आपल्या पालिकेमध्ये जे मोठे प्रशासकीय अधिकारी आहेत ते शहरामध्ये राहणारे नाही. तुम्ही संध्याकाळी जाऊन ही परिस्थिती बघा. श्री. हरेश पाटील त्याच रोडवर राहतात. त्यामुळे ते तुम्हाला सर्व परिस्थिती सांगतील. आपण जर अतिक्रमण हटविले तर तिथे चालणे कठीण नाही. अतिक्रमण हटविल्यानंतर लोकांना तिथे श्वास घ्यायला जागा मिळेल. धन्यवाद.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आताच तुम्ही सांगितले की आपण 'ना फेरीवाला क्षेत्र' मध्ये पैसे कलेक्ट करु शकत नाही. परंतु आतापर्यंत 'ना फेरीवाला क्षेत्र' मध्ये जे पैसे कलेक्ट केलेले आहेत, ते पैसे त्यांच्याकडून कशामध्ये जमा करणार ते सांगा? आजसुध्दा नवघर रोड आणि बी.पी. रोडला पैसे कलेक्शन करणे चालू आहे. म्हणूण आतपर्यंत पैसे कलेक्ट करण्याबाबत सांगा.

**गजानन भोईर :-**

साहेब, तो ठेकेदार बोलेल की मी त्या फेरीवाल्यांकडून पैसे वसूल केले नाहीत. त्याच्यापेक्षा तुम्ही त्या ठिकाणी 'ना फेरीवाला क्षेत्र'चा बोर्ड लावा.

**प्रेमनाथ पाटील :-**

माझ्याकडे त्या क्षेत्रात फेरीवाल्यांचे पैसे वसूल केल्याचे पुरावे आहेत.

**गजानन भोईर :-**

आपण या ठिकाणी बोलतो. आपल्याला बोलायला काही नाही. परंतु, त्याचा परिणाम आपल्या महानगरपालिकेवर होऊ शकतो. त्याच्यापेक्षा आजच आपले 'ना फेरीवाला क्षेत्र'चे बोर्ड आवले आणि उद्यापासून त्या फेरीवाल्यांचे तिथे बसणे बंद केले तर हा वाद मिटेल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही आता सांगितले की, कर्मचाऱ्यांनी हातगाड्या उचलल्या पाहिजेत आणि 'ना फेरीवाला क्षेत्र' मध्ये बसणाऱ्या फेरीवाल्यांना हाकलले पाहिजे. परंतु, तुम्ही त्या कर्मचाऱ्यांची व्यथा कधी ऐकूण घेतलेली आहे का? त्या कर्मचाऱ्यांना हातगाडी ठेवायला जागा उपलब्ध नाही. आपल्या कर्मचाऱ्यांनी ज्या हातगाड्या उचलून आणलेल्या आहेत. त्या आपल्याकडे तशाच सडून पडलेल्या आहेत. अतिक्रमण विभागाचे दुसरे कर्मचारी येतात आणि दुसऱ्या हातगाडीवर दंड लावून दुसरी हातगाडी घेऊन जातात. त्याच्यावर कुठेतरी अंकुश ठेवायला पाहिजे किंवा त्या हातगाड्या विथ ईन ए विक डिस्पोज केल्या पाहिजेत. जेणेकरुन फास्ट ॲक्शन होईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही त्या हातगाड्यांचा लिलाव करा.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही त्या हातगाड्यांचा लिलाव करा.

**कैलासबेन जानी :-**

एकदा श्री. शिवमुर्ती नाईक साहेबांनी त्या हातगाड्या काढलेल्या होत्या.

**गजानन भोईर :-**

हल्ली गाड्यांचासुध्दा लिलाव करतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण अजूनपर्यंत गाड्यांचा लिलाव ठेवलेला नाही. आपण फक्त फस्ट टाईम लिलाव केलेला होता.

**कैलासबेन जानी :-**

एक वेळेला रु. १ लाखाचे भंगार विकले होते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

भंगार आणि हार्डवेअर डिस्पोजल वेगळे आहे.

**ग्रिटा फॅरो :-**

परंतु, त्याच गाड्या पुन्हा रस्त्यावर येतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही त्या गाड्या डिस्पोज करा. मी गाड्या डिस्पोज करायला सांगितलेल्या आहेत. मी गाड्यांचा लिलाव करायला सांगितले नाही. तुम्ही त्या हातगाड्या इमिजिएटली डिस्पोज करा. म्हणजे त्या हातगाड्या पुन्हा रस्त्यावर लागणार नाहीत.

**गजानन भोईर :-**

फेरीवाल्याची एकट्याची फक्त एकच गाडी नसून एका फेरीवाल्याच्या वीस-वीस गाड्या आहेत. या वीस-वीस गाड्या नावघर रोड आणि बी.पी. रोडला आहेत. त्या वीस-वीस गाड्या एका फेरीवाल्याच्या असुन त्या फेरीवाल्याने त्या सर्व गाड्या भाड्याने दिलेल्या आहेत.

**मा. आयुक्त :-**

ज्या गाड्या पकडलेल्या आहेत. त्यांच्या दंडाची रक्कम किती आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, दंडाची रक्कम रु. १२००/- आहे. आणि हातगाडीची किंमत रु. ६०००/- आहे.

**मा. आयुक्त :-**

मी या संदर्भात अशी माहिती घेतली की, महासभेत एक ठराव केलेला आहे आणि त्या फेरीवाल्यांना सात दिवसांची मुदत दिलेली आहे. जर सात दिवसांच्या मुदतीमध्ये हातगाडीवाल्यांनी गाडीची मागणी केली तर जो काही दंड ठरविलेला आहे आपण त्या दंडाची रक्कम घेऊन ती गाडी त्यांना परत देऊ.

**ग्रिटा फॅरो :-**

परंतु, त्या फरीवाल्यांना वॉर्निंग दिली जाते.

**मा. आयुक्त :-**

आपण त्या फेरीवाल्यांना वॉर्निंग देतो आणि आपण त्यांच्याकडून लेखी स्वरुपाचेसुध्दा लिहून घेतो. परंतु, त्याच्यावर असे निर्बंध टाकायला पाहिजे की आपण त्या फेरीवाल्यांची तीच गाडी पुन्हा जप्त केली तर आपण त्या फेरीवाल्यांना ती गाडी परत द्यायची नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही त्या गाड्यांचे आयडेन्टिफिकेशन करु शकत नाही. कारण अतिक्रमण विभागाने केलेल्या हजारो गाड्या आहेत. त्या हजारो गाड्या आयडेन्टिफाय होऊ शकत नाही. शिवाय, आपल्या मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये हजारो फेरीवाले असल्यामुळे अतिक्रमण विभागाचा कर्मचारी आयडेन्टिफाय करु शकत नाही. समजा, आपण एका फेरीवाल्याची हातगाडी जप्त केली आणि त्या फेरीवाल्याला सात दिवसाची मुदत देऊनसुध्दा तो फेरीवाला गाडी घ्यायला आला नाही तर त्याची हातगाडी इमिजिएटली डिस्पोज करा.

**मा. आयुक्त :-**

आपण आतापर्यंत अशा प्रकारच्या ब-याचशा गाड्या जप्त करुन ठेवलेल्या आहेत. माझ्या माहितीप्रमाणे त्या गाड्यांचा लिलाव झालेला नाही. अजून गाड्या असतील तर आपण त्या गाड्या लिलावासाठी बाहेर काढू आणि लवकरात लवकर डिस्पोज करु.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, तुम्ही माझ्या प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य, तुम्ही जो प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्याबाबत जे काही पुरावे असतील तुम्ही ते पुरावे आम्हाला दाखवा. आपण ते पुरावे बघून योग्य तो निर्णय घेऊ.

**मा. सभापती :-**

एकूण किती पैसे वसुल केलेले आहेत?

**प्रेमनाथ पाटील :-**

एका गाडीचे रु. १५/- आणि दुकानदाराकडून रु. २५०/- कलेक्शन केले जाते.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील, तुम्ही माझ्याकडे या. मी त्या ठेकेदाराला बोलावतो आणि सगळा रिपोर्ट घेतो.

**प्रभात पाटील :-**

आताच सन्मा सदस्य गजानन भोईर बोलले की एका माणसाकडून जागेचे रु. १५ हजार ते २० हजार घेतले जातात ही सध्याची वस्तुस्थिती आहे. समजा, या ठिकाणी माझी गाडी आहे. मी एक महिना, दोन महिने सहा महिने किंवा वर्षभर काम केले तरी मी ही जागा इथुन हलवताना सन्मा. सदस्या कैलासबेन जानी यांना संगितले की, मुझे मेरी गाडी हटानेकी है। तर सन्मा. सदस्या कैलासबेन जानी सांगतील की, जागा मला पाहिजे. मला ती जागा द्या. अशाप्रकारे नगरपालिकेची जागा रु. १० हजार ते रु. २० हजारला मिळते.

**एस. ए. खान :-**

जगहकी किमत एरिया के उपर डिपेन्ड है।

**कैलासबेन जानी :-**

एका जागेचे रु. ३० हजार घेतले जातात.

**प्रभात पाटील :-**

त्या जागेची किंमत एरियाप्रमाणे आहे हे बरोबर आहे. तो माणूस आपल्या रस्त्यावर गाडी लावतो आणि आपल्या रस्त्यावरचे पैसे तो माणूस घेतो. आणि नविन होणाऱ्या रस्त्यावर टपरी लावतो.

**गजानन भोईर :-**

मी माझ्या प्रभागातील एक गोष्ट सांगतो. माझ्या प्रभागातील एक फेरीवाला गावी जाताना त्याची जागा रु. ५००/- भाड्याने देऊन गेला. जागा रु. ५००/- ने भाड्याने दिल्यानंतर तो फेरीवाला तीन महिन्यांनी परत आला तो त्या फेरीवाल्याचा जुना गिऱ्हाईक होता. त्यांनी त्या ठिकाणी नविन धंदा काढलेला होता. त्यांची त्या ठिकाणी मारामारी होऊन ती केस पोलिस स्टेशनपर्यंत गेलेली होती. त्या फेरीवाल्याने त्याची जागा दर महिन्याला रु. ५००/- प्रमाणे तिथे धंदा करायला बसण्यासाठी भाड्याने दिलेली होती. असे प्रकारसुध्दा घडतात.

**केशव घरत :-**

मा. सभापती साहेब, मला एक प्रश्न उपस्थित करायचा आहे. या ठिकाणी दोन डम्पर खरेदी करण्याबाबत विषय आलेला आहे. परंतु, आपल्या पालिकेचे जे दहा डम्पर सन २००२ साली घेतलेले होते. ते चालतात का? जर तुम्ही कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर आरोग्याचे सगळे टेन्डर दिलेले असतील तर हे दहा डम्पर कुठे चालतात? ते सांगा.

**मा. सभापती :-**

अतिक्रमण विभागाला हे सगळे उचलायला सांगितलेले होते.

**केशव घरत :-**

साहेब, तुम्ही बोलता ते बरोबर आहे परंतु, हे दहा डम्पर कुठे आहेत?

**प्रेमनाथ पाटील :-**

आपले जुने डम्पर कुठे आहेत? सन २००२ साली महानगरपालिका स्थापन झालेली आहे. आपण त्यावेळेला दहा डम्पर मागितलेले होते. ते दहा डम्पर कुठे आहेत? असे सन्मा. सदस्य केशव घरत यांचे म्हणणे आहे.

**केशव घरत :-**

सन २००२ साली महानगरपालिका नव्याने स्थापन झाली तेव्हा जे दहा डम्पर घेतले होते ते दहा डम्पर कुठे चालतात?

**मा. सभापती :-**

याबाबत आरोग्य विभागाने माहिती द्यावी.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही याबाबत वाहन विभागाला विचारा.

**सुर्यकांत भोईर :-**

वाहन विभागाला विचारा.

**केशव घरत :-**

आपल्याला नविन दोन डम्पर घ्यायचे आहेत. मग आपले दहा डम्पर कुठे आहेत? कारण आपण हे डम्पर आरोग्य विभागासाठी घेतलेले होते. दुसरे म्हणजे अतिक्रमण विभागाने जी काही अतिक्रमणे तोडलेली आहेत. त्याच्यामधून किती पैसे गोळा झालेले आहेत. किंवा त्याच्यामधून किती उत्पन्न मिळालेले आहे. त्याचीसुध्दा माहिती द्यावी. जे अतिक्रमण किंवा बिल्डींग तोडल्या जातात त्याच्यामधून त्या लोकांकडून जी वसुली केली जाते. आपल्याकडे त्याचे किती पैसे गोळा झालेले आहेत. किंवा महापालिकेकडे आजपर्यंत अनधिकृत बांधकामाच्या वसुलीचे किती पैसे गोळा झालेले आहेत? ते सांगा.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही हा प्रश्न अतिक्रमण विभागाशी संबंधित विचारत आहात का?

**केशव घरत :-**

मी हा प्रश्न अतिक्रमण विभागाशी संबंधित विचारत आहे. आपण इमारती तोडल्यानंतर त्या लोकांकडून काही दंड वसुल केला जातो. आपण तो दंड आजपर्यंत किती वसुल केला?

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्याला रु. ६ लाखाची गरज नाही.

**कैलासबेन जानी :-**

काही बिल्डींग तोडलेल्या आहेत. काही दुकाने तोडलेली आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती महोदय, भाईंदर रोडला लागून जी काही कामे चाललेली आहेत. ती कामे अनधिकृत आहेत की अधिकृत आहेत त्याचा तपशील देण्यांत यावा. ही कामे भाईंदरच्या सर्व्हिस रोडला चाललेली आहेत. त्या लोकांनी परमिशन घेतलेली आहे की नाही ते सांगा.

**गजानन भोईर :-**

एक काम हायटेन्शनच्या वायर पासून अशोक हॉटेलपर्यंत केलेले आहे. स्टिल वर्कच्या दुकानाचा हात लागेल एवढे उंच बांधकाम केलेले आहे. त्या बांधकामाला कोणी आणि कसे परमिशन दिले ते सांगा. साहेब, ती हायटेन्शनची वायर पाच फुटावर आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

भाईंदरला जी कामे चाललेली आहेत. त्या लोकांनी परमिशन घेतलेली आहे की नाही तेवढेच प्रथम सांगा?

**गजानन भोईर :-**

ते अधिकारी अजूनपर्यंत आलेले नाहीत. त्यामुळे आण हा विषय पुन्हा घेऊया. आपण मागचा एक विषयसुध्दा पेन्डिग ठेवलेला आहे.

**केशव घरत :-**

परंतु, विषयाचे विषयांतर होईल.

**गजानन भोईर :-**

रिलायन्सवाल्यांनी जे पोल लावलेले आहेत त्या ठिकाणी हायटेन्शनची वायर गेल्यामुळे छोटा पोल लावलेला आहे. म्हणजे जी रोड लावलेली आहे. तिथे हायटेन्शनची वायर वर न गेल्यामुळे छोटा पोल लावलेला आहे. परंतु, आपले बांधकाम त्याच्यापेक्षाही उंच गेलेले आहे. हे बांधकाम अशोक हॉटेल जवळून उंच गेलेले आहे. त्याने नक्की परमिशन घेतलेले आहे की ते बांधकाम अनधिकृत केलेले आहे. ते कळणे आवश्यक आहे. उद्या काही दुर्घटना घडली तर ती आपली जबाबदारी असेल.

**प्रेमनाथ पाटील :-**

रिलायन्सवाल्याला भीती वाटते म्हणूण त्याने आपली स्ट्रीट लाईट छोटी केलेली आहे. परंतु, ते बांधकाम अनधिकृत असायला भीती नाही.

**अजिज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण ज्या हातगाड्या वगैरे उचलतो, त्याचे यावर्षी रु. २ लाख ९६ हजार ३२५ जमा झालेले आहेत. हे सर्व हातगाडीचे दंड वसुलीचे वगैरे पैसे जमा झालेले आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

आता तो विषय नाही. आपण अतिक्रमण हटविण्यासाठी किंवा बिल्डींग तोडण्यासाठी पन्नास मजूर आणि दोन डम्पर मंजूर केले. आपण हे सर्व मजूर अतिक्रमण हटविण्यासाठी मंजूर केलेले आहेत. त्यामुळे त्याचा संबंध बांधकाम विभागाशीसुध्दा येतो.

**अजिज शेख (मा. उपायुक्त साो.) :-**

आपण आता जे पन्नास मजूर आणि दोन डम्पर मंजूर केलेले आहेत. ते आपल्या फेरीवाल्यांवर कारवाई करण्यासाठी नेमलेले लोक आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

म्हणजे ही लोक अतिक्रमण तोडण्यासाठी नेमलेली नाहीत का?

**अजिज शेख (मा. उपायुक्त साो.) :-**

फेरीवाल्यांनी जे अतिक्रमण केलेल आहे, ते अतिक्रमण तोडण्यासाठी ही लोक नेमलेली आहेत.

**केशव घरत :-**

आपण जे काही अतिक्रमणच्या बिल्डींग वगैरे किंवा अनधिकृत बांधकाम तोडतो आपल्याकडे त्याचे किती पैसे गोळा झालेले आहेत ते सांगा.

**मा. आयुक्त :-**

अनधिकृत बांधकामाविषयीचा वेगळा प्रश्न आहे आणि अतिक्रमणचा वेगळा प्रश्न आहे. तुम्हाला नक्की कुठली माहिती पाहिजे.

**प्रेमनाथ पाटील :-**

आम्हाला अनधिकृत बांधकाम आणि अतिक्रमण अशा दोन्ही गोष्टींची माहिती हवी आहे.

**केशव घरत :-**

आम्हाला अनधिकृत बांधकाम आणि अतिक्रमण अशा दोन्ही गोष्टींची माहिती हवी आहे.

**अजिज शेख (मा. उपायुक्त साो.) :-**

आपण अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करतो. समजा, एखादी बिल्डींग तोडली तर आपण त्याच्यावर मॅन पॉवर खर्च करतो. आपली वाहने देत असतो. आपण पोलिस बंदोबस्तसुध्दा देत असतो. त्यामुळे आपल्याला खर्च होत असतो. आपल्याला तो खर्च वसुल करणे बंधनकारक आहे. परंतु, माझ्या माहितीप्रमाणे आपण अशा प्रकारची बिले वगैरे दिलेली नाहीत. आम्ही आता नविन प्रथा सुरु केलेली आहे. जो काही खर्च होत आहे. आम्ही त्याबाबत लोकांना बिले द्यायला सुरुवात केलेली आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, तुमचे म्हणणे असे आहे का? की, आपल्या मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये अजूनपर्यंत अनधिकृत बांधकामे झालेला नाहीत.

**केशव घरत :-**

सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील, आपल्या क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे तोडली नाहीत असे त्यांना म्हणायचे असेल.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्या क्षेत्रात अनधिकृत बांधकामे झालेली नाही असे तुम्हाला म्हणायचे आहे की, अनधिकृत बांधकामे तोडलेली नाहीत असे तुम्हाला म्हणायचे आहे ते सांगा.

**अजिज शेख (मा. उपायुक्त साो.) :-**

आपण आपल्या क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे तोडलेली आहेत. परंतु, अजूनपर्यंत त्या अनधिकृत बांधकामाचे पैसे वसुल केलेले नाहीत.

**प्रेमनाथ पाटील :-**

अनधिकृत बांधकामाचे पैसे वसुल करायला एवढा विलंब का लागला?

**केशव घरत :-**

तुम्ही चार वर्षे झाली अनधिकृत बांधकाम तोडूनसुध्दा आजपर्यंत त्याचा एकही पैसा वसुल केलेला नाही.

**अजिज शेख (मा. उपायुक्त साो.) :-**

आपण आता पैसे वसुल करायला सुरुवात केलेली आहे.

**केशव घरत :-**

आपण गाड्या वगैरे घेऊन कार्यवाही करीत नाही असा अर्थ झाला.

**जयंत पाटील :-**

आता हा जो ठराव झालेला आहे. त्या ठरावाचे इम्प्लिमेन्टेशन होत नाही.

**अजिज शेख (मा. उपायुक्त साो.) :-**

आपण आता ठरावावर इम्प्लिमेन्टेशन करायला सुरुवात केलेली आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, मला एक माहिती द्या. मिरा भाईंदर रोडला जी लगतची कामे चालू आहेत.........

**मा. सभापती :-**

डम्परबाबतची माहिती पुढच्या मिटींगला देण्यांत येईल.

**केशव घरत :-**

तुम्हाला आता माहिती द्यायला काय प्रॉब्लम आहे?

**सुर्यकांत भोईर :-**

ही माहिती पुढच्या मिटींगला का घ्यायची?

**मा. सभापती :-**

तुम्हाला खोटी माहिती दिलेली चालेल?

**केशव घरत :-**

वाहन विभागाच्या लोकांना विचारा?

**सुर्यकांत भोईर :-**

आपल्याकडे वाहन विभाग आहे. वाहन विभागाच्या अधिकाऱ्यांना विचारा आणि त्यांना माहिती द्यायला सांगा.

**प्रभात पाटील :-**

परंतु, खोटी माहिती का द्यायची?

**गजानन भोईर :-**

एखाद्या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन तो विषय घ्यायला पाहिजे. त्याचे संपूर्ण देणे बाकी असेल तर तुम्ही त्याबाबतचा गोषवारा द्यायला पाहिजे.

**केशव घरत :-**

मा. सभापती महोदय, आपल्याला अधिकारी खोटी माहिती देतात असा याचा अर्थ झाला.

**गजानन भोईर :-**

जर मुलाचे नांव माहित नसेल तर मुलाच्या वडिलांचे नांव लिहा. त्या मुलाचा पत्ता लिहा. साहेब, एखादा गोषवारा देताना त्या गोषवा-यासाठी आवश्यक असणारी संपूर्ण माहिती दिली तर हा गोंधळ होणार नाही.

**मा. सभापती :-**

हा गोषवारा दुस-या खात्याचा आहे हे तुम्हाला माहिती आहे का?

**गजानन भोईर :-**

दुस-या खात्याचा गोषवारा म्हणजे हे आपल्या महापालिकेचे खाते आहे.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेब, मागच्या वेळेला आरोग्याबाबतचा विषय आलेला असतानासुध्दा वाहनाबाबतची माहिती दिली गेली नाही.

**राजकुमार कांबळे :-**

आरोग्य विभागाकडे एकूण नऊ डम्पर आहे.

**केशव घरत :-**

साहेब, आपल्याकडे एकूण दहा डम्पर आहेत आणि तुम्ही बोलता की आपल्याकडे एकूण नऊ डम्पर आहेत. मग एक डम्पर कुठे आहे?

**राजकुमार कांबळे :-**

या सर्व डम्परपैकी एक डम्पर काशीमि-याला, दोन डम्पर मिरारोडला, तीन डम्पर भाईंदर (पू.) ला, दोन डम्पर भाईंदर वेस्टला आहे. असे एकूण नऊ डम्पर आहेत. हे नऊ डम्पर मिरा भाईंदर क्षेत्रातील मटण किंवा चिकनचे दुकान आणि वेस्टच्या हॉटेलसाठी वापरण्यात येतात. आपण त्या लोकांकडून प्रतिमाह रु. ३००/- प्रमाणे वसुल करतो. आपण ही वसुली प्रत्येक हॉटेल आणि मटण, चिकन शॉपकडून करतो. आपण मटण आणि हॉटेलचा वेस्ट उचलण्यासाठी डम्पर लावलेले आहेत.

**प्रभात पाटील :-**

हे नऊ डम्पर संपूर्ण दिवसभर असतात का?

**राजकुमार कांबळे :-**

आपण हे डम्पर संपूर्ण दिवसासाठी दिलेले आहेत.

**केशव घरत :-**

हे डम्पर आरोग्याशी निगडीत कामासाठी वापरत नाही का?

**मा. सभापती :-**

ह्या डम्परचा समावेश आरोग्य खात्यामध्ये होतो. परंतु, थोडा वेगळा वापर केला जातो.

**राजकुमार कांबळे :-**

आपण हे डम्पर कचरा उचण्यासाठी वापरत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण ते डम्पर कशासाठी वापरतो?

**राजकुमार कांबळे :-**

आपण ते डम्पर मटण, चिकन आणि हॉटेलमधील वेस्टसाठी वापरतो.

**केशव घरत :-**

साहेब, तुम्ही म्हणालात ते बरोबर आहे. परंतु, हे काम आरोग्य खात्याने करायला पाहिजे. आरोग्य विभागाच्या कॉन्ट्रॅक्टरने त्या लोकांना गाडी द्यायला पाहिजे. ते सर्व वेस्ट उचलायला महापालिकेने गाडी का द्यावी?

**मा. आयुक्त :-**

महापालिका जी गाडी देते. महापालिका त्या गाडीचा मोबदला वसुल करते. आपण त्यांना रु. ३००/- सांगितले तर आपण त्यांच्याकडून रु. ३००/- घेतो.

**सुर्यकांत भोईर :-**

ही रु. ३००/- किंमत प्रति दुकान आहे?

**मोहन पाटील :-**

आता एकूण किती रक्कम जमा झालेली आहे ते सांगा?

**राजकुमार कांबळे :-**

तुम्हाला ती रक्कम लगेच आणून दिली जाईल.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्या मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये आरोग्याच्यादृष्टीने बऱ्याच तक्रारी आहेत.

**राजकुमार कांबळे :-**

आम्हाला मिरारोडमध्ये जवळजवळ दोन पाळींमध्ये मटण-चिकनचा वेस्ट उचलावा लागतो. मिरारोडमध्ये सर्वात जास्त मटण-चिकन आणि हॉटेलचे प्रमाण आहे.

**गजानन भोईर :-**

साहेब, आपण दुकानाला डम्परचा चार्ज लावतो का?

**मा. सभापती :-**

आपल्याला दुकानाकडूनसुध्दा पैसे वसुल होणार आहेत.

**गजानन भोईर :-**

दुकानांकडून डम्परची किती वसुली होते?

**राजकुमार कांबळे :-**

दुकानांकडून डम्परची रु. ३००/- प्रतिमाह वसुली केली जाते.

**मा. सभापती :-**

एक डम्पर किती फेऱ्या मारतो?

**राजकुमार कांबळे :-**

एका डम्परच्या जास्तीत जास्त दोन फेऱ्या होतात. कारण प्रत्येक दुकानाजवळ हॉटेलचे वेस्ट उचलण्यासाठी थांबावे लागते.

**एस. ए. खान :-**

हॉटेलच्या आतमध्ये जाऊन सर्व वेस्ट उचलून आणण्यासाठी थांबावे लागत असेल. कारण ती लोक चिकनचे वेस्ट बाहेर आणून ठेवत नाहीत. वेस्ट उचलण्यासाठी गाडी गेल्यावर ती लोक सगळा वेस्ट बाहेर आणतात. कारण गाडी येण्यापूर्वी तो वेस्ट बाहेर आणाला तर सर्व घाण वास पसरु शकतो. तेसुध्दा कचरा गाडी येण्यापूर्वी बाहेर आणतात. परंतु, हा कचरा गाडी येण्यापूर्वी बाहेर आणूण ठेवत नाहीत. म्हणूण त्या गाडीला कचरा उचलायला उशीर लागतो आणि त्या गाडीच्या दोन फेऱ्या होतात.

**राजकुमार कांबळे :-**

एक डम्पर अतिक्रमण विभागाला दिलेला आहे.

**प्रभात पाटील :-**

समजा, मला एखादे मटणचे दुकान काढायचे असेल आणि मला त्याबाबत परवानगी मिळत नसेल तर मला ते दुकान काढण्यासाठी परवानगीची आवश्यकता लागते का? कारण माझ्या वॉर्डमध्ये मटणाचे एक नविन दुकान उघडलेले आहे. त्या दुकानाबाबत आम्हीच तक्रारी करायच्या का? आपले लोकसुध्दा सगळ्या वॉर्डमध्ये फिरत असतात किंवा आपल्या महापालिकेच्या लोकांनीसुध्दा सगळ्या वॉर्डमध्ये फिरले पाहिजे.

**राजकुमार कांबळे :-**

आम्ही याबाबत चौकशी करु.

**मा. आयुक्त :-**

संबंधित अधिकाऱ्यांनी याबाबत चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करावी.

**प्रभात पाटील :-**

कारण ते लोणच्याचे वगैरे दुकान नाही. आम्हाला कळले पाहिजे.

**गजानन भोईर :-**

साहेब, आम्ही तक्रार केली तर कार्यवाही व्हायला पाहिजे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, आपल्या मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये दि. ३०/१२/२००५ रोजी विषारी वायुचे लिकेज झालेले होते. मी त्या संदर्भात आरोग्य विभागाला पत्रव्यवहार केलेला होता. परंतु, मला अजूनपर्यंत त्या पत्राचे उत्तर देण्यांत आलेले नाही. त्या ठिकाणी ललित विद्या निकेतन नावाची एक शाळा आहे. ती मराठी शाळा आहे. तिकडे विषारी वायुचे लिकेज झाल्यामुळे त्या दिवशी तिकडच्या विद्यार्थ्यांना लवकर सोडावे लागले. तिकडची आजुबाजूची सगळी लोक तिथुन पळून गेली. त्या ठिकाणी एवढा उग्र वास येत होता. ती कारखान्याची गळती होती. त्या कारखानदाराला अठ्ठेचाळीस तासाची नोटिस दिलेली होती. त्या कारखानदाराला नोटिस देऊनसुध्दा त्याने काहीही कार्यवाही केलेली नाही. त्याची कंपनी आजसुध्दा चालू आहे.

**मा. आयुक्त :-**

त्या कंपनीवाल्याला नोटिस दिलेली होती का?

**अजिज शेख (मा. उपायुक्त साो.) :-**

आम्ही त्याबाबतचे पेपर्स मागवलेले आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्या कंपनीवाल्याला नोटिस दिलेली होती आणि नोटिस देऊन अठ्ठेचाळीस तास होऊन गेलेले आहेत.

**मा. आयुक्त :-**

जोपर्यंत त्या कारखान्यावर कार्यवाही होत नाही तोपर्यंत तो कारखाना बंद ठेवायला सांगा.

**जयंत पाटील :-**

प्रदुषणसुध्दा वाढू शकते.

**प्रेमनाथ पाटील :-**

कोणी कसेही असु दे आपल्याला कार्यवाही करावी लागेल.

**गजानन भोईर :-**

साहेब, तो केमिकलचा कारखाना आहे. तो कारखाना धुमसुन प्रदुषण वाढणार आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, त्याच्या बाजूला ललित विद्या निकेतन स्कुल ही मराठी शाळा आहे.

**मा. आयुक्त :-**

प्रदुषण वगैरे होत असेल तर त्या कारखानदाराला त्याचा कारखाना बंद ठेवायला सांगा.

**प्रभात पाटील :-**

साहेब, तुम्हाला मागच्या वेळेला बफिंगबाबत तक्रार करायला सांगितलेली होती.

**प्रेमनाथ पाटील :-**

बफिंगवालेसुध्दा ॲडजेस्टमेन्ट बाहेर मेन रोडवर लावतात.

**प्रभात पाटील :-**

साहेब, इथले कारखानदार बफिंगसुध्दा ठेवत नाहीत. ते बफिंगसुध्दा बाहेर लावतात.

**मा. सभापती :-**

त्या बफिंगवाल्यांनी ॲडजेस्टमेन्ट बाहेर लावलेले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

एक कंपनीवाला लॅन्डिग आणि कटिंग करतो. त्याचा भरपुर आवाज येतो. सध्या विद्यार्थ्यांच्या परिक्षा चालू आहेत. आपण त्यांना नोटिस दिलेली होती. परंतु, ती लोक नोटिस घेत नाहीत. त्याच्या बाजूला बफिंगचे गाळे आहेत. बफिंगचासुध्दा भरपुर वास आणि धुर येतो. त्यांनी ते सर्व ॲडजेस्टमेन्ट रोडच्या बाजूने लावलेले आहे आणि ओपन ठेवलेले आहे.

**प्रभात पाटील :-**

त्या कंपनीवाल्यांना नोटिस देऊनसुध्दा ते लोक नोटिस घेत नाहीत.

**मा. आयुक्त :-**

संबंधित अधिकाऱ्यांनी त्या ठिकाणचा सर्व्हे करुन योग्य ती कार्यवाही करावी.

**गजानन भोईर :-**

त्या फॅक्टऱ्या तिथे वसलेल्या आहेत. परंतु, त्या फॅक्टऱ्यांना चिमण्यासुध्दा नाहीत.

**प्रेमनाथ पाटील :-**

फॅक्टऱ्यांनी चिमण्या लावल्या तरी आम्ही त्याचा विरोध करीत नाही. चिमण्या लावल्या तर त्या फॅक्टरीमधील धुर वर निघून जातो.

**गजानन भोईर :-**

काही फॅक्टऱ्यांना चिमण्या नाहीत. आपल्या एरियामध्ये काही फॅक्टऱ्या असुनसुध्दा त्यांना परवानगी दिलेली नाही.

**मा. आयुक्त :-**

त्या कंपन्या त्या ठिकाणी वर्षानुवर्षे चालू आहेत की बंद झालेल्या आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्या कंपन्या चालू आहेत.

**प्रभात पाटील :-**

त्या कंपन्या वर्षानुवर्षे चालू आहेत.

**गजानन भोईर :-**

त्या कंपन्या वर्षानुवर्षे चालू आहेत.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही आतापर्यंत त्रास सहन केलेला आहे ना. मग आपल्या विभागातुन त्या फॅक्टरीवाल्याला नोटिस गेलेली असेल ना.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, आपल्या विभागाकडून त्या कंपनीवाल्याला नोटिस दिलेली आहे. परंतु, तो कंपनीवाला ती नोटिस ॲक्सेप्ट करीत नाही.

**गजानन भोईर :-**

आपल्याकडे ग्रामपंचायतपासून नगरपालिका आणि आता नगरपालिकेची महानगरपालिका झालेली आहे. आपल्याला आता तरी तिकडे सुधारणा करायला पाहिजे.

**मोहन पाटील :-**

आपण ग्रामपंचायतपासून काम केल्यामुळे महानगरपालिका झालेली आहे. इंडस्ट्रीवाले आले त्यांनी इंडस्ट्री बांधल्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

इंडस्ट्रीवाल्यांनी इंडस्ट्री बांधल्या. त्याला आमचा विरोध नाही.

**मोहन पाटील :-**

आपण त्या इंडस्ट्रीवाल्यांना सुविधा दिल्या पाहिजेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्याकडे इंडस्ट्रीवाल्यांनी इंडस्ट्री बांधल्या ही एक चांगली गोष्ट आहे. कारण आपल्याला त्या इंडस्ट्रीवाल्याकडून जकातचे उत्पन्न मिळते.

**गजानन भोईर :-**

त्या इंडस्ट्रीवाल्यांबाबत आपली जबाबदारी आहे.

**मोहन पाटील :-**

त्या इंडस्ट्रीवाल्यांबाबत आपली जबाबदारी आहे. परंतु, आपल्या क्षेत्रातील किंवा भाईंदर ईस्टच्या विकासाबाबतचे मुळ कारण इंडस्ट्री आहे.

**गजानन भोईर :-**

आपल्याला इंडस्ट्री बंद करायची नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्याला इंडस्ट्री बंद करायची नाही.

**प्रभात पाटील :-**

इंडस्ट्री बंद करायचा प्रश्नच येत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, इंडस्ट्रीला काही ठराविक टाईम लिमिट असते का? म्हणजे इंडस्ट्री एवढ्या वाजल्यापासून एवढ्या वाजेपर्यंत सुरु करावी असा काही टाईम लिमिट असतो का? इंडस्ट्री सकाळी चालू करावी आणि संध्याकाळी ठराविक वेळेला बंद करावी असे काही टाईम लिमिट असते का?

**मा. आयुक्त :-**

माझ्या माहितीप्रमाणे इंडस्ट्रीला ठराविक असे टाईम लिमिट नाही. इंडस्ट्री चोविस तास चालू असते.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, मिरारोडच्या सर्व्हिस रोडला जी कामे चालू आहेत, त्याबाबत माझा एक प्रश्न होता त्याचे उत्तर दिलेले नाही.

**मा. आयुक्त :-**

आता रस्त्यावर जी कामे चाललेली आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

सिल्व्हर पार्कच्या आजुबाजुच्या रस्त्यावर कामे चालू आहेत.

**मा. आयुक्त :-**

माझे बोलणे पूर्ण होऊ दे. आता रस्त्यावर जी कामे चालू आहेत, सध्या ती कामे बंद केलेली आहेत. आम्ही त्या संदर्भात दुरुस्तीची परवानगी दिलेली आहे. त्या दुरुस्तीच्या परवानगीखाली ज्या काही त्या इंडस्ट्री उभ्या आहेत. मी स्वतः जाऊन काही इंडस्ट्री बंद केलेल्या आहेत. आम्ही त्याच्यांवर ॲक्शन घेणार आहोत.

**घेवारे :-**

आरक्षण क्र. १६२ हे गाड्यांसाठी आरक्षण असुन त्याचा एरिया चार हजार चौ. मी. आहे. म्हणजे एक एकर आहे. याची मालकी आर.एन.ए. बिल्डरची आहे.

**मोहन पाटील :-**

ही मालकी रोड सोडून आहे ना.

**घेवारे :-**

ही मालकी रोड सोडून आहे.

**मोहन पाटील :-**

ही क्लिअरकट जागा असेल ना.

**घेवारे :-**

ही क्लिअरकट जागा आहे. आपल्याला आर.एन.ए. बिल्डरने टी.डी.आर.साठी प्रस्ताव दिलेला होता. त्याच्यामध्यें काही तक्रारी झालेल्या आहेत. ती जमीन शासकीय मालकीची असल्याचा वाद प्रांत ऑफिसला सुरु आहे. त्याच्यामुळे आम्ही त्या बिल्डरचा टी.डी.आर. थांबवलेला आहे. तो वाद जोपर्यंत निकाली निघत नाही तोपर्यंत ती जागा महापालिकेच्या ताब्यात येऊ शकत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

हा विषय वादाचा असताना या ठिकाणी कशाला आणला?

**जयंत पाटील :-**

तुम्ही हा विषय प्रशासकीय व आर्थिक मंजूरीसाठी का आणला?

**प्रेमनाथ पाटील :-**

हा विषय न्यायप्रविष्ठ असताना इकडे कशाला आणला?

**गजानन भोईर :-**

महासभा असो किंवा स्थायी समिती असो आपण प्रत्येक वेळेला हे न्यायप्रविष्ठ प्रकरण असल्याचे सांगतो.

**घेवारे :-**

याचा वाद प्रांत ऑफिसमध्ये सुरु आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

शेवटी त्या बिल्डरला टी.डी.आर. लागणार आहे.

**रतन पाटील :-**

तो बिल्डर सरकारी जागेवर टी.डी.आर. मागतो म्हणजे तो किती हुषार बिल्डर आहे ते बघा.

**जयंत पाटील :-**

आपण त्या बिल्डरला टी.डी.आर. द्यायचा आणि आपण त्या बिल्डरच्या भानगडी सांभाळून घ्यायच्या का?

**मा. आयुक्त :-**

आपण त्या बिल्डरला टी.डी.आर. दिलेला नाही.

**गजानन भोईर :-**

परंतु, ती जागा आपल्या ताब्यात आहे का?

**केशव घरत :-**

ती जागा आपल्या ताब्यात आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. सभापती साहेब, ते गार्डन विकसित होत असेल तर आपल्याला गार्डन विकसित करायला काय हरकत आहे? किंवा आपण दोघांच्या वॉर्डमधून गार्डन विकसित करु शकतो. मग गार्डन विकसित करायला काहीही हरकत नाही असे मला वाटते.

**जयंत पाटील :-**

आपण गार्डन करु शकत नाही. कारण ती एक न्यायप्रविष्ठ बाब आहे.

**गजानन भोईर :-**

आपण गार्डन विकसित कसे करणार? ती जागा सरकारी आहे की मालकी हक्काची आहे तेच माहिती नाही.

**जयंत पाटील :-**

दुसरी गोष्ट म्हणजे त्या बिल्डरने आपल्या नावावर कन्व्हेन्स केलेले आहे का? ती जागा महानगरपालिकेच्या नावावर कन्व्हेन्स झाली पाहिजे.

**रतन पाटील :-**

त्या जागेला टी.डी.आर. देणार का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपल्याला त्या जागेबाबत टी.डी.आर. द्यावा लागेल.

**मा. आयुक्त :-**

जागेच्या मालकीबाबत वाद चालू आहे.

**जयंत पाटील :-**

आपण जागा आपल्या नावावर कन्व्हेन्स करु शकतो का?

**मा. आयुक्त :-**

त्या जागेच्या मालकी हक्काचा वाद चालू आहे आणि सात बाऱ्याच्या उताऱ्याला आर.एन.ए. बिल्डरचे नांव आहे. कोणीतरी जिल्हा कार्यालयामध्ये तक्रार केलेली असल्यामुळे त्याबाबत तहसीलदार आणि प्रांत ऑफिसरकडे केस चालू आहे. परंतु, आज जी जागा रिकामी आहे, त्या जागेवर कोणीतरी बाहेरुन येऊन अतिक्रमण करण्यापेक्षा आपण त्या ठिकाणी भराव केला तर योग्य होईल. ब्रिजकडे जाताना लेफ्ट साईडला जी मोक्याची जागा आहे त्या जागेवर कोणीही अतिक्रमण करु शकते. पुन्हा ती व्यक्ती कोर्टात जाऊन कार्यवाही करणार. आम्ही तुम्ही सांगतल्याप्रमाणे शहांनिशा करीत बसलो तर तिथे अतिक्रमण होईल.

**जयंत पाटील :-**

जर ती जागा आर.एन.ए. बिल्डरच्या नावावर असेल तर काही मोठा वाद निर्माण होणार नाही असे मला वाटते.

**मा. आयुक्त :-**

सात-बारा उताऱ्यावर बिल्डरचे नांव आहे.

**जयंत पाटील :-**

मग कुठलाही प्रॉब्लम निर्माण होणार नाही.

**मा. आयुक्त :-**

आपण आपल्या सेफ साईडसाठी त्याला टी.डी.आर. दिलेला नाही.

**जयंत पाटील :-**

जर तो बिल्डर ती जागा आपल्या नावावर कन्व्हेन्स करायला तयार असेल तर हरकत नाही.

**मा. आयुक्त :-**

आपली त्या बिल्डरबरोबर चर्चा चालू आहे. ही जागा कन्व्हेन्स करुन द्या असे आपण त्या बिल्डरला सांगत आहे.

**जयंत पाटील :-**

त्या बिल्डरने ती जागा आपल्याला कन्व्हेन्स केल्यानंतर आपण त्या जागेसाठी खर्च करु शकतो. आपण अगोदर त्या जागेला खर्च करु शकत नाही. आपण फक्त त्या खर्चाला मंजूरी देऊया.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण तोपर्यंत वॉल कंपाऊन्ड बांधून घेऊया.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण वॉल कंपाऊन्ड अगोदर बांधू शकत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपल्याला त्याच्यामध्ये फायदा आहे. आर.एन.ए. बिल्डर आपल्याकडे आला तर आपण त्याला प्रांत ऑफिसरकडे पाठवू. आपल्याकडे प्रांत ऑफिसर आला तर आपण त्याला आर.एन.ए. बिल्डरकडे पाठवू.

**केशव घरत :-**

बऱ्याच बिल्डरनी सरकारी जागेवर सात-बाऱ्याचे उतारे देऊन नांवे लावलेली आहेत.

**जयंत पाटील :-**

आपल्याला प्रशासकीय व आर्थिक मंजूरी घ्यायला हरकत नाही असे मला वाटते.

**मोहन पाटील :-**

आम्ही ज्या निविदा काढणार आहोत, त्या सर्व निविदा तमच्या समोर सादर होणार आहेत आणि निविदा आल्यानंतर तुम्ही काय झाले ते शकता किंवा त्याच्यावर तुमचे मत व्यक्त करु शकता.

**केशव घरत :-**

आपण तोपर्यंत निविदा मंजूर करुन घेऊया.

**मा. आयुक्त :-**

मी सर्व सन्मा. सदस्यांच्या माहितीसाठी सांगु इच्छितो की, या जागेवर पानाच्या टपऱ्या लागलेल्या होत्या आणि अजून कसल्या तरी टपऱ्या लागलेल्या होत्या. त्या लोकांनी कोर्टामध्ये जायचे, कोर्टाकडून स्टेटेस्को आणायचा आणि आपण हात वर करुन बघत रहायचे. त्यापेक्षा आपण आता योग्य ॲक्शन घेऊया.

**जयंत पाटील :-**

आपण त्या आर.एन.ए. बिल्डरला टी.डी.आर. देतो आणि त्या जागेबाबत प्रशासकीय व आर्थिक मंजूरी घेतो तर आपण त्या जागेवर ही जागा महानगरपालिकेच्या मालकीची असल्याचे बोर्ड लावू शकतो का?

**मा. आयुक्त :-**

आपण त्या जागेवर महापालिकेची जागा असल्याचे बोर्ड लावू शकतो.

**जयंत पाटील :-**

ती जागा मिरा भाईंदर महापालिकेच्या मालकीची असल्याचे बोर्ड लावा.

**एस. ए. खान :-**

मा. आयुक्त साहेबांनी सांगितलेले बरोबर आहे. तिथे टपऱ्या वगैरे लागलेल्या होत्या.

**कैलासबेन जानी :-**

तुम्ही तसे बोर्ड लावा.

**रमेश जैन :-**

शिवार गार्डनके पिछे ऐसे बोर्ड लगाये है।

(सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईर यांनी ठरावाचे वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. १८९ :-**

पुर्नविनियोजन करणेबाबत. (अतिक्रमण विभाग)

**ठराव क्र. १९५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अनधिकृत बांधकामे / अतिक्रमणे नियंत्रण विभागामार्फत शहरांतील मुख्य रस्त्यांवरील / पदपथावरील, गटारांवरील होणारी अतिक्रमणे हटविण्याकामी प्रभाग अधिकाऱ्यांमार्फत अतिक्रमण निर्मुलन पथके तयार करण्यांत आलेली आहेत. सदर पथकांमार्फत वेळोवेळी मोहिमा राबवून महापालिका क्षेत्रांतील ना फेरीवाला क्षेत्र, गटारावरील, पदपथावरील तसेच मुख्य रस्त्यावरील आदी ठिकाणी होणारी अतिक्रमणे हटविण्यंत येत असतात. महापलिकेचा विस्तार पाहता अतिक्रमण विभागाकडे मजूर व वाहन संख्या कमी असल्याने उपरोक्त अतिक्रमणे हटविण्याकामी आरोग्य विभागातील मंजूर दरानुसार २ डंपर व ५० मजूर कर्मचारी पुरवठा करणेसाठी कंत्राटदार मे. गुडलक कंन्स्ट्रक्शन कंपनी यांना कार्यादेश देण्यांत आलेले आहेत. सन २००५-०६ या आर्थिक वर्षात अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे हटविणेकामी मजूर पुरवठा या शिर्षाखाली रक्कम रु. २,००,०००/- इतकी तरतूद करण्यांत आली होती. सदर रक्कमेपैकी बरीचशी रक्कम खर्च झालेली आहे. सद्यस्थितीत सन २००५-०६ या आर्थिक वर्षातील उर्वरीत ४ महिन्याचा कालावधी पाहता उपरोक्त कारवाईसाठी मजूर व वाहन (डंपर) पुरवठ्याचे कंत्राटदाराची देयके अदा करण्यासाठी अतिक्रमण विभगाच्या आकस्मित खर्च व अनधिकृत बांधकामे / अतिक्रमणे हटवितेवेळी फोटोग्राफ्स व विडिओ शुटींग भाड्याने घेण्या ह्या शिर्षाखाली असलेली तरतुद रक्कम रु. ६,००,०००/- मधील माहे नोव्हेंबर २००५ अखेरी पर्यंत झालेला खर्च व पुढील ४ महिन्याचा होणारा संभाव्य खर्च वगळता उर्वरीत रक्कम रु. ४,९६,१२८/- इतके शिल्लक असून सदरची रक्कम अतिक्रमणे हटविणेकामी कंत्राट पद्धतीने मजूर / वाहन उपलब्ध करणे ह्या लेखा शिर्षात वर्ग केल्यास संबंधित कंत्राटदारांची देयके अदा करणे शक्य होईल. याबाबतचा तपशिल नमुना क्र. १०, नियम ३० नुसार तक्त्यामध्ये सादर केलेला आहे.

तरी मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ मधील अनुसूची ड प्रकरण ७ मधील कलम २ नुसर मा. स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. मोहन म. पाटील.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १९० चे वाचन केले

(सन्मा. सदस्य सुर्यकांत भोईर यांनी ठरावाचे वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**गजानन भोईर :-**

मा. सभापती साहेब, या ठरावामध्ये काही मीटर स्लो चालतात असा उल्लेख केलेला आहे. परंतु, काही मीटर स्लो चालतात असे आपण कुठे चेक केलेले आहे. आपण त्या जागेवर युरोपियन इकोनॉमी कमिशन मीटर लावतो .........

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तो विषय नंतर येईल.

**गजानन भोईर :-**

दोन्ही एकच विषय आहेत. दोन्ही समान विषय आहेत.

**मोहन पाटील :-**

हा विषय जाऊ दे. तुम्ही दुसऱ्या विषयावर बोला.

**गजानन भोईर :-**

मी आता या विषयावर बोलत नाही. दुसऱ्या विषयावर बोलतो. आपली महानगरपालिका स्थापन झाल्यानंतर पहिल्या स्थायी समितीच्या सभेमध्ये कार्यशाळा बनविण्याबाबत एक ठराव झालेला होता.

**मोहन पाटील :-**

आपण हा विषय पुढच्या वेळेला घेऊया.

**मा. आयुक्त :-**

या विषयाचे रिॲप्रॉप्रिएशन करा.

**प्रकरण क्र. १९० :-**

पुर्नविनियोजन पत्रकास मंजुरी देणे (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. १९६ :-**

वरील विषयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सद्यस्थितीत २५ मिमी ते ५० मिमी. व्यासाचे एकूण २०६१ व्यावसायिक (Commercial) कनेक्शन आहेत. सदर कनेक्शनसाठी सध्या NON ISO/EES मेकॅनिकल मीटर बसविले असून त्यातील बरेचसे मीटर हे नादुरुस्त आहेत. तसेच काही मीटर स्लो चालतात. त्यामुळे व्यावसायिक ग्राहकांना पाण्याचा खप अपेक्षित अचुकतेने (Accuracy) करता येत नाही. परिणामी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये बरीचशी तुट निर्माण होते. त्यासाठी सध्याच्या मिटरच्या जागी (MJP) च्या स्पेशिफिकेशन नुसार ISO/EES (युरोपीयन इकोनॉमिक कमिशन) हे मीटर व्यावसायिक ग्राहकांना १५ मिमी, २५ मिमी व ५० मिमी व्यासाचे मीटर बसविणे, पुरविणे इ. कामासाठी सुमारे रु. ४५,९६,५४०/- इतका खर्च अपेक्षित आहे. मात्र सदर खर्चाकरिता **''साहित्य खरेदी''** या लेखाशिर्षाअंतर्गत फारच कमी तरतूद शिल्लक आहे.

वरील कामाच्या खर्चाची तरतुद करणे कामी पाणी पुरवठा विभागातील **''नवीन पाणी पुरवठा योजना''** या लेखाशिर्षामध्ये रु. १,००,००,०००/- शिल्लक असून मार्च २००५ पर्यंत रु. १०,००,०००/- खर्च अपेक्षित आहे. तरी सदर लेखाशिर्षातून **''साहित्य खरेदी''** या लेखाशिर्षात रु. ९०,००,०००/- वर्ग केल्यास वरील कामे करणे शक्य होईल व त्यामुळे मनपाच्या उत्पन्नामध्ये वाढ होईल. याबाबतचा तपशिल नमुना क्र. १० नियम ३० नुसार तक्त्यामध्ये माहिती सोबत जोडलेली आहे. तरी वर नमुद केल्याप्रमाणे **''नवीन पाणी पुरवठा योजना''** या लेखाशिर्षातील रु. १,००,००,०००/- मधून **''साहित्य खरेदी''** करीता रु. ९०,००,०००/- वर्ग करण्याचा पुर्नविनीयोजनाचा प्रस्तावास मा. स्थायी समिती सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. सुर्यकांत भोईर.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १९१ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य एस. ए. खान यांनी ठरावाचे वाचन केले.)

**ज्युडी डिसोझा :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**गजानन भोईर :-**

श्री. बारकुंड साहेब, मला थोडी माहिती द्या. आपले मीटर स्लो चालतात आणि युरोपियन इकॉनॉमीचे मीटर लावून फास्ट चालतात असे आपण कुठे चेक केलेले आहे ते सांगा.

**शिवाजी बारकुंड :-**

आम्ही कमर्शियल मीटर चेक केलेले आहेत. ते मीटर स्लो चालतात. ते मीटर ग्लोबल मेड असल्यामुळे ते मीटर ॲडजेस्ट होतात आणि ते मीटर बंद पडतात. कमर्शियल मीटर जे व्यावसायिक ग्राहक आहेत त्यांना युरोपियन इकॉनॉमी कमिशनच्या मीटरमध्ये काहीही फेरफार करता येत नाही. आपल्याला त्यांनी पंधरा दिवसापूर्वी मीटर रिडिंग देण्यापेक्षा आपण जे दर तीन महिन्याला मीटर रिडिंग घेतो त्यामुळे नगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये निश्चितच वाढ होणार आहे.

**कैलासबेन जानी :-**

परंतु, आपले जुने मीटर वापरुनसुध्दा नगरपालिकेचे नुकसान होत नाही.

**गजानन भोईर :-**

तुम्ही एवढ्या रु. ९० लाखाचे काय करणार आहात?

**मा. आयुक्त :-**

आपण रु. ९० लाखाचे रिॲप्रॉप्रिएशन करीत आहोत.

**केशव घरत :-**

रु. ९० लाख रिॲप्रॉप्रिएशनचे आहेत.

**शिवाजी बारकुंड :-**

रिॲप्रॉप्रिएशनची अमाऊंट रु. ९० लाख नसुन रु. ४५ लाख आहे.

**जयंत पाटील :-**

श्री. बारकुंड, या मीटरचे काय लाईफ असेल ते सांगा.

**रतन पाटील :-**

श्री. बारकुंड साहेब, तुम्ही अर्धवट माहिती दिलेली आहे. आपण हे मीटर कशा पध्दतीने बसवणार आहोत. ते मीटर ठेका पध्दतीने बसविले तर त्याचा कालावधी किती असेल त्याची संपूर्ण माहिती द्या.

**शिवाजी बारकुंड :-**

या मीटरचा कालावधी कॉपरेशन आणि मेन्टेनन्स असा पाच वर्षाचा आहे. ते मीटर बसवायचे आणि पाच वर्षामध्ये ऑपरेशन व मेन्टेनन्स करायचे. त्यांनी दर पंधरा दिवसाला इकडे मीटर रिडिंग आणून द्यायचे. आपला मीटर रिडर तिकडे मीटर रिडिंग घ्यायला जाणार नाही.

**रतन पाटील :-**

जर त्या मीटर रिडिंगमध्ये काही घोटाळा केला किंवा घोटाळा झाला तर काय करायचे?

**शिवाजी बारकुंड :-**

ती लोक ह्या मीटर रिडिंगमध्ये काहीही करु शकत नाहीत.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, आपण जे मीटर बसविणार आहोत आपण ते मीटर ज्या व्यक्तीच्या कमर्शियल गाळ्यामध्ये बसविणार आहोत. आपण त्या व्यक्तीकडून त्या मीटरचा चार्ज घेणार नाही का?

**शिवाजी बारकुंड :-**

आपण सध्या त्या व्यक्तीकडून मीटरबाबतचा चार्ज घेणार नाही. परंतु, आपण आपण या मीटरबाबत पुढच्या बजेटला तरतुद करुया.

**अजिज शेख (मा. उपायुक्त साो.) :-**

आपण तो प्रस्ताव महासभेमध्ये ठेवूया.

**प्रेमनाथ पाटील :-**

तोपर्यंत आपले पैसे त्याच्यामध्ये गुंतत असतात.

**मा. आयुक्त :-**

आपण ही पध्दत व्यावसायिकता म्हणून सुरु करीत आहोत. आपल्या क्षेत्रामध्ये व्यावसायिक आहेत. आपण ही पध्दत वाणिज्य विभागामध्ये सुरु करीत आहोत. आपण ही पध्दत रहिवास विभागामध्ये सुरु करीत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

या ठिकाणी कमर्शियल म्हटलेले आहे. त्यामुळे ही पध्दत व्यावसायिकांकरीता असेल.

**मा. आयुक्त :-**

आपण ही पध्दत प्रायोगिक तत्वावर सुरु करीत आहोत. आपण वाणिज्य विभागामध्ये सक्सेस झालो तर आपण ही पध्दत रहिवास विभागामध्येसुध्दा चालू करु.

**केशव घरत :-**

परंतु, असे किती मीटर लागतील ते सांगा?

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण ह्याच्यासाठी रु. १ करोडची गुंतवणूक करीत आहोत.

**शिवाजी बारकुंड :-**

आपण रु. १ करोडची गुंतवणूक न करता रु. ४५ लाखाची गुंतवणूक करीत आहोत.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण रु. ४५ लाखाची गुंतवणूक करीत आहोत. मग तुमचे पाण्याच्या ह्याच्यामधून रु. ९० लाखाचे उत्पन्न मिळेल का?

**शिवाजी बारकुंड :-**

आपल्याला रु. ९० लाखाचे उत्पन्न मिळेल.

**गजानन भोईर :-**

पहिल्या स्थायी समितीमध्ये कार्यशाळा स्थापन करण्याचा ठराव झालेला होता. आपल्या क्षेत्रामध्ये कार्यशाळा नसल्यामुळे आपले नागरिक मालाड, कांजूरमार्ग वगैरेला जातात. त्यामुळे पहिल्या स्थायी समितीमध्ये कार्यशाळेबाबतचा ठराव झालेला होता.

**एस. ए. खान :-**

श्री. बारकुंड साहेब, पाणी वेळेवर येत नाही. ते जरा बघा.

**मोहन पाटील :-**

आपण पूर्वी जे टेस्ट रिपोर्ट मागवायचो तो टेस्ट रिपोर्ट या ठिकाणी मागवायचो म्हणून ती कार्यशाळा सुरु करावी. आपण अशाप्रकारे आपल्या बजेटच्या मिटींगमध्येसुध्दा चर्चा केलेली होती. ते करुन घ्या. कारण आपल्याला प्रत्येक वेळेला सदस्य कार्यशाळेविषयी सांगतात. त्यामुळे कार्यशाळेचे काम होणे आवश्यक आहे. दुसरी गोष्ट म्हणजे भाईंदर पूर्वेला पाणी व्यवस्थित येत नाही. आपण सगळीकडे चावीस तास पाणी सोडतो. परंतु, भाईंदर पूर्वेला पाणी फक्त तीस ते बत्तीस तासांनी येते याच्यावर काय करायचे?

**प्रभात पाटील :-**

भाईदर पूर्वेला हे पाणी कमीत कमी चोवीस तास व्यवस्थित जाते.

**शिवाजी बारकुंड :-**

एक गोडदेवच्या टाकीवर असा झोन होता की आपण नवघरवरुन तीन झोन गोडदेवच्या टाकीवर शिफ्ट केले. एकूण अकरा झोन होते आता त्या ठिकाणी आठ झोन राहिलेले आहेत.

**कैलासबेन जानी :-**

अकरा झोन असुनसुध्दा पाणी चोवीस तास येत नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

आम्ही ते झोन बी.पी. रोडलासुध्दा शिफ्ट केलेले आहेत. आता ते पाणी चोवीस तासावर येईल.

**मोहन पाटील :-**

ते पाणी चोवीस तासावर कधी येईल ते सांगा?

**शिवाजी बारकुंड :-**

तिथे सध्या काम चालू आहे. त्यामुळे सांगु शकत नाही.

**मोहन पाटील :-**

सात दिवसात चोवीस तास पाणी सोडा.

**कैलासबेन जानी :-**

मा. सभापती साहेब, भाईंदर वेस्टलासुध्दा पंचवीस ते तीस तासांनी पाणी येत आहे.

**रमेश जैन :-**

भाईंदर वेस्टला बत्तीस तासानंतर पाणी येत आहे.

**मोहन पाटील :-**

भाईंदर वेस्टला बत्तीस तासांनी पाणी येते असे तुम्ही काय बोलता? भाईंदर वेस्टला पाणी व्यवस्थित येते.

**रतन पाटील :-**

प्रथम भाईंदर ईस्टचे बघा. आम्हाला भाईंदर ईस्टची परिस्थिती माहिती आहे. भाईंदर ईस्टला व्यवस्थित पाणी येत नाही. आम्ही याच मताचे आहोत.

**कैलासबेन जानी :-**

तुम्हाला कोणी सांगितले की भाईंदर वेस्टला पाणी व्यवस्थित आहे. आम्ही तुम्हाला भाईंदर वेस्टची परिस्थिती बघायला घेवून जातो.

**प्रकरण क्र. १९१ :-**

प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. १९७ :-**

वरिल संदर्भिय विषयान्वये मिरा भाईंदर मनपा क्षेत्रामध्ये सद्यस्थितीत २५ मिमी व्यासाच्या एकूण ७१० व्यावसायिक (Commercial) कनेक्शन आहेत. सदर कनेक्शनसाठी सध्या NON ISO/EES मेकॅनिकल मीटर बसविले असून त्यातील बरेचसे मीटर हे नादुरुस्त आहेत. तसेच काही मीटर स्लो चालतात. त्यामुळे मिरा भाईंदर मनपा क्षेत्रात व्यावसायिक ग्राहकांना सरासरी रुपाने तर काही ग्राहकांना कमी मापदंडाने पाणी पुरवठा करण्यात येतो. सध्याचे अस्तित्वातील मीटर NON ISO/EES या प्रकारचे असल्याने त्याचे गिअर्स असलेले काही भाग काही कालावधीनंतर लगेचच नादुरुस्त होतात. त्यामुळे व्यावसायिक ग्राहकांना पाण्याचा खप अपेक्षित अचुकतेने (Accuracy) करता येत नाही. परिणामी मिरा भाईंदर मनपाच्या उत्पन्नामध्ये बरीचशी तुट निर्माण होते.

त्यासाठी सध्याच्या मिटरच्या जागी (MJP) च्या स्पेशिफिकेशन नुसार ISO/EES नविन (युरोपीयन इकोनॉमिक कमिशन) या मिटर प्रमाणे व्यावसायिक ग्राहकांना २५ मिमी व्यासाचे मीटर बसविणे, पुरविणे इ. कामाचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

सदर ISO/EES नविन मेकचे मीटर हे अत्याधुनिक स्वरुपाचे असून ते मॅग्नेटिकल कपल्डरित्या कंपाऊंड असल्याने त्याचे इम्पलेअर व रोटर असेम्बली आयसोलेटेड असते. त्यामुळे पाण्याच्या दाबामूळे व इतर कारणांमुळे मीटर लगेच नादुरुस्त होत नाही अथवा मीटर स्लो चालणे इ. बाबी उद्‌भवत नाहीत. नविन

मीटरची अचुकता देखिल मेकॅनिकल मीटरपेक्षा चोगली आहे. (+ 2%) त्यामुळे मिरा भाईंदर मनपाच्या उत्पन्नात निश्चितच वाढ अपेक्षित आहे. तसेच नविन मीटरचे आयुष्यमान देखील जास्त आहे. सदरचा ISO/EES मीटरचा प्रस्ताव हा सर्व समावेशक पद्धतीचा असल्याने मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या व्यावसायिक ग्राहकांना पाणी पुरवठा करणे महानगरपालिकेस निश्चितच फायदेशीर ठरेल व ह्या पद्धतीचे ठळक फायदे खालील प्रमाणे अपेक्षित आहेत.

१) व्यावसायिक ग्राहकांना होणारा पाणी पुरवठा अचुकतेने करणे.
२) त्याचे परिणाम (Qty) प्रत्यक्ष वापराप्रमाणे ISO मीटर प्रमाणे मोजणे.
३) व्यावसायिक ग्राहकांना मापदंडाप्रमाणे अचुक पाणी देणे व उत्पन्न मिळवणे.
४) अचुक मीटर पद्धतीमुळे पाण्याच्या वापरावर अप्रत्यक्षरित्या काटकसर / बचत होते.
५) महानगरपालिकेच्या उत्पन्नात भरीव वाढ करणे.

उपरोक्त ISO/EES मीटर २५ मिमी पुरविणे व बसविणे इ. कामासाठी एकूण रु. ४५,९६,५४०/- एवढा खर्च अपेक्षित आहे. तरी वरील बाबींचा विचार करता महानगरपालिका क्षेत्रात ISO/EES मेकचे मीटर पुरविणे व बसविणे इ. कामाच्या प्रस्तावास मा. स्थायी समिती सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**सुचक :- ॲड. श्री. एस्. ए. खान.** **अनुमोदन :- श्रीम. ज्युडी डिसोझा.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १९२ चे वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

हा विषय मंजूर आहे.

**केशव घरत :-**

बी.एस.ई.एस.ला जे नाल्याचे बांधकाम सुरु आहे, आपल्याला तेथील पाईपलाईन उंच करायची आहे. मी बी.एस.ई.एस.च्या इथुन हटकेशमधून जाणाऱ्या रस्त्याबाबत बोलत आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

मागच्या आठवड्यामध्ये श्री. दामोदर साहेब वगैरे आलेले होते. त्यांच्याबरोबर मिटींग झालेली होती. त्यांचा रिपोर्ट दिलेला आहे. पुढच्या महिन्यात काम होईल असे सांगितलेले आहे.

**केशव घरत :-**

साहेब, तुम्ही लक्ष द्या. नाहीतर नाल्याचे काम अर्धवट राहिले तर काहीही उपयोग होणार नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

त्या नाल्याच्या लिकेजचे काम झालेले आहे.

**केशव घरत :-**

नाल्याच्या लिकेजचे काम झालेले आहे. परंतु, पुढच्या भागाचा कार्यक्रम आखलेला आहे. आणि नाल्याच्या पाठीमागचा भाग पूर्ण झालेला आहे. ती पाईपलाईन उंच करायला पाहिजे.

**गजानन भोईर :-**

साहेब, गोडदेव नाल्यापासून नवघर नाल्यापर्यंत गटार चालू केलेले आहे. त्या गटारावर स्लॅब टाकायला सुरुवात केलेली आहे. त्या पाईपलाईनचे जे केबल आहेते जसेच्या तसे आहेत. त्याला पावसामध्ये घोणी, गांडूळ किंवा कुठलेही किटक लागतात. नळ कनेक्शन आणि टेलिफोनची लाईन थोडी वर घेतली तर त्याला अडथळा होणार नाही.

**मा. सभापती :-**

माझी सर्व खात्याच्या अधिकाऱ्यांना एक विनंती आहे. मी आरोग्य खात्याला सांगु इच्छितो की, सध्या शहरामध्ये मच्छरांचे प्रमाण भरपुर वाढलेले आहे. आपल्याला लोकांकडून भरपुर ऐकायला लागत आहे. त्यामुळे शहरामध्ये औषध फवारणी केली जावी आणि चांगल्याप्रकारचे औषध वापरले जावे अशी मी त्यांना विनंती करतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, त्यांना आदेश द्या. त्यांना विनंती करु नका.

**रतन पाटील :-**

साहेब, बायर कंपनीचे औषध मागवा.

**मा. सभापती :-**

मी प्रथम आरोग्य खात्याच्या अधिकाऱ्यांना विनंती करतो आणि नंतर त्यांच्या मागे लागतो.

**जयंत पाटील :-**

त्यांना विनंती काय करता?

**रमेश जैन :-**

बायर्स कंपनीका दवाई मंगवानी चाहिए।

**कैलासबेन जानी :-**

बायर्स कंपनीका नाम लिख लिजिए।

**मा. सभापती :-**

आता मी बांधकाम विभागाचे अधिकारी श्री. दिपक खांबित यांना सांगु इच्छितो की, आता आपल्याकडे गटाराची काही कामे चाललेली आहेत. परंतु आपण नविन आणि करोडो रुपयांची गटारे केली तरी या जनतेला त्या गटारांचा काहीही उपयोग होणार नाही. कारण त्याच्यामध्ये पाईपलाईन आणि बी.एस.ई.एस.च्या सुध्दा लाईन आहेत. त्यामुळे तुम्हाला त्यांच्याबरोबर पत्रव्यवहार करावा लागेल.

**गजानन भोईर :-**

मी तुम्हाला आधीच सांगितले की तुम्ही बी.एस.ई.एस.च्या लाईन वर घ्यायला पाहिजेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही बी.एस.ई.एस.च्या लाईन वर घ्यायला सांगा.

**एस. ए. खान :-**

मा. सभापती साहेब, आपले जे गटाराचे काम चालू आहे. त्याची जी माती आहे, ती माती आपल्या दोन-तीन ठिकाणच्या गार्डनमध्ये डेव्हलप करण्यासाठी टाकायला सांगितले होते. ती लोक ती माती तिथे न टाकता घेऊन जातात. मी त्याबाबत दोन-तीन वेळा पत्रव्यवहार केलेला होता. प्रभाग क्र. ११ प्रभाग क्र. ०४ आणि साईबाबा नगरला असे घडलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

आपण प्रभाग अधिकाऱ्यांना समक्ष लेखी सुचना देऊ.

**एस. ए. खान :-**

मी प्रभाग अधिकाऱ्यांना लेखी सुचना दिलेली आहे. परंतु, ठेकेदार ती माती गार्डनमध्ये न टाकता कुठेतरी दुसरीकडे घेऊन जातो.

**मा. आयुक्त :-**

तसे असेल तर तुम्ही ठेकेदारांना तसे सांगा.

**एस. ए. खान :-**

मी चार-चार वेळा सांगितलेले आहे. मी त्याबाबत पत्रव्यवहार केलेला आहे. मी प्रभाग क्र. ११, प्रभाग क्र. ०४ आणि साईबाबा नगरचे पत्र त्या-त्या विभागाच्या प्रभाग कार्यालयामध्ये दिलेले आहे.

**कैलासबेन जानी :-**

६० फुट रोडला जागेचे काम चालू आहे. त्याचे खांबच्या खांब पडलेले आहेत.

**मा. सभापती :-**

याबाबत श्री. राजकुमार कांबळे यांनी उत्तर द्यावे.

**मा. आयुक्त :-**

श्री. दिपक खांबित, माती टाकतात म्हणून त्यांना माती तिथे न टाकण्याची ताकीद द्या.

**कैलासबेन जानी :-**

आम्ही क्लिअरकट सांगतो की ६० फुट रोडला जो गॅप आहे. त्याच्यामध्ये मोठे-मोठे दगड टाकतात.

**दिपक खांबित :-**

गार्डनमध्येच माती टाकतात.

**एस. ए. खान :-**

गार्डनमध्ये माती टाकत नाहीत. सरळ माती घेऊन दुसरीकडे टाकतात.

**मा. आयुक्त :-**

कुठल्या ठेकेदाराने गाड्या टाकल्या नाहीत.

**एस. ए. खान :-**

आजुबाजुला सगळे ठेकेदाराचे काम चाललेले आहे.

**मा. आयुक्त :-**

आरोग्य विभागाचे ठेकेदार आहे की, बांधकाम विभागाचे ठेकेदार आहेत?

**एस. ए. खान :-**

बांधकाम विभागाचे ठेकेदार आहेत.

**दिपक खांबित :-**

कुठल्याही विभागाचे ठेकेदार असु दे.

**मा. आयुक्त :-**

जो ठेकेदार असेल त्याच्या बिलामधुन पैसे कापले जातील.

**मा. सभापती :-**

आरोग्य विभागाचे अधिकारी कुठे आहेत?

**एस. ए. खान :-**

सध्या प्रभाग क्र. ११, प्रभाग क्र. ०४, प्रभाग क्र. ०५ ला गटाराचे काम चालू आहे.

**कैलासबेन जानी :-**

ती लोक गटार बनवायला गटाराचे पाणी वापरतात.

**प्रभात पाटील :-**

साहेब, मी मागच्या वेळेला बोलली होती की, नगरपालिकेच्या अधिका-यांनी दुपारी ३.०० नंतर चक्कर मारली पाहिजे.

**रतन पाटील :-**

सभापती साहेब, मी मागच्या वेळेला सांगितले होते की, अंदाजपत्रकाचा आढावा प्रत्येक खातेवाईस घ्या. तुम्हाला पुढच्या मिटींगपासुन असा आढावा घ्या असे सांगितले होते. परंतु, तो आढावा या ठिकाणी आलेला नाही. तुम्ही तो आढावा कधी घेणार आहात.

**कैलासबेन जानी :-**

तो आढावा तीन-तीन महिन्यांनी द्यायला पाहिजे.

**रतन पाटील :-**

अंदाजपत्रकाचा आढावा तीन-तीन महिन्यांनी प्रत्येक खातेवाईस द्यायला पाहिजे. परंतु, तो आढावा अजुनपर्यंत दिलेला गेला नाही. तुम्ही तो आढावा कधी देणार आहात? मागच्या प्रोसिडिंगला पंधरा दिवस झालेले आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, हा आढावा पुढच्या मिटींगला द्या.

**मा. सभापती :-**

आपण हा आढावा पुढच्या मिटींगला देऊ शकत नाही. कारण या गोष्टी लवकर होत नाहीत. त्यांना थोडा वेळ लागतो.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही सभापती पदावर येऊन पाच महिने झालेले आहेत. अंदाजपत्रकाचा आढावा तीन-तीन महिन्यांनी द्यायला पाहिजे. अंदाजपत्रकाचा प्रत्येक विभागाचा आढावा तीन-तीन महिन्यानंतर घ्यावा लागतो. किती पैसे खर्च केले? किती पैसे जमा केले? हे अंदाजपत्रकाच्या आढाव्यावरुन समजते.

**मा. सभापती :-**

मी प्रत्येक खात्याच्या अधिका-यांना अंदाजपत्रकाचा आढावा द्यायला सांगतो. तसेच, अंदाजपत्रकाचा आढावा तयार करुन पुढच्या दोन-तीन महिन्यामध्ये सादर करावा अशी मी सुचना करतो.

**कैलासबेन जानी :-**

अंदाजपत्रकाचा आढावा प्रत्येक महिन्याला दिला नाही तरी तीन-तीन महिन्यानंतर द्यायला पाहिजे.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही सर्व अधिका-यांना आदेश द्या.

**मा. सभापती :-**

मी सर्व अधिका-यांना आदेश देऊन दोन-तीन महिन्यांमध्ये अंदाजपत्रकाचा आढावा द्यायला सांगितलेले आहे.

**प्रकरण क्र. १९२ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजूर केलेल्या कामाचे अवलोकन करणे. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. १९८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकरीता मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | मजूर संस्थेचे नाव |
|---|---|---|---|
| १ | कमला पार्क, सुदामानगर येथे व ७७७ जलकुंभाच्या आवारातील अल्ट्रासोनीक मीटर रुमची किरकोळ कामे करणे. | १,२०,५१८/- | श्री. मयुरेश्वर मजूर कामगार सहकारी संस्था मर्या., ठाणे |
| २ | ब्रम्हदेव मंदिर (शिवार गार्डन) समोर बिडाची जलवाहिनी अंथरणे. | १,९२,००४/- | मे. एस. एन. इंटरप्रायजेस |

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | मजूर संस्थेचे नाव |
|---|---|---|---|
| ३ | गळती दुरुस्तीसाठी सी.आय. क्लॅम्पचा पुरवठा करणे. | ४,८६,८३०/- | महालक्ष्मी मजुर कामगार सहकारी संस्था मर्या. |

सबब उपरोक्त प्रस्तावांचे मा. स्थायी समिती सभेने अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**दुःखवटा ठराव क्र. १९८(अ) :-**

महानगरपालिकेच्या जेष्ठ सदस्या श्रीम. जेन्वी अल्मेडा यांचे भाऊ बसीक अन्सेका यांचे दुःखद निधन झालेले आहे. त्यांच्या मृतात्म्यास चिरशांती लाभो असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्रीम. ग्रिटा फॅरो.** **अनुमोदक :- श्रीम. ज्युडी डिसोझा.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग आणि मनपा कर्मचारी वर्ग आपण सर्वांनी ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडल्याबद्दल सर्वांचे आभार मानुन सभा संपल्याचे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी ०१.०० वाजता.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**